ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
जानेवारी २०२३
किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४ वर्ष : ६७
अंक : १० पुणे.

# जीवन शिक्षण

Jeevan Shikshan
January 2023
Price ₹30
Pages 44 Vol. : 67
Issue : 10 Pune.

## भारतीय प्रजासत्ताक चिरायू होवो!

विजयी विश्व तिरंगा प्यारा...
झंडा ऊँचा रहे हमारा...



ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

आगच्छन् शिक्षार्थम् । निर्गच्छन् सेवार्थम्

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद.

## SLA अंतर्गत वेबिनार उद्‌घाटन समारंभ

**मार्गदर्शन**



**मा. रणजितसिंह देओल (भा.प्र.से.)**
प्रधान सचिव
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
महाराष्ट्र राज्य



**मा. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.)**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.



**मा. शरद गोसावी**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

विषय -
**परीक्षेला सामोरे जाताना**

सोमवार, दि. २३ जानेवारी २०२३,
स. ११.३० वाजता

MIEPA YouTube Live

**व्याख्याते**



**मा. अनिल गुंजाळ**
माजी सहायक आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.

**SCERT,** महाराष्ट्र, पुणे आणि महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद यांच्यावतीने इयत्ता दहावीचे आणि बारावीचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी 'परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर दि. २३ जानेवारी २०२३ रोजी वेबिनार घेण्यात आले. यावेळी मा. श्री. रणजितसिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, मा. श्री.कौस्तुभ दिवेगावकर, संचालक, **SCERT,** महाराष्ट्र, पुणे, मा. श्री. शरद गोसावी, अध्यक्ष, महा. राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे. यांनी परीक्षेची चिंता दूर होण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून मा. श्री. अनिल गुंजाळ, माजी सहायक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांनी 'परीक्षेस कसे सामोरे जावे' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे चे नवनियुक्त संचालक मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते ७४ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांनी ध्वजास मानवंदना दिली.





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे **SCF, NEP-2020**, समग्र शिक्षा, **'STARS'** प्रकल्प इ. च्या अनुषंगाने दि. २७ जानेवारी २०२३ रोजी आढावा बैठक घेण्यात झाली. यावेळी मा. श्री. रणजितसिंह देओल, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी विविध कामकाजाचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी मा. श्री. रमाकांत काठमोरे, परिषदेचे सहसंचालक, सर्व उपसंचालक आणि सर्व अधिकारी उपस्थित होते.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६७ | जानेवारी २०२३ | अंक १० वा



❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) — **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** — **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** — **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि
सा. शास्त्रे व कला-क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** — **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**राजेंद्र शिंदे,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा उपविभाग प्रमुख (प्रसारमाध्यम) — **सदस्य सचिव**

❖ **निर्मिती सहायक :**
सलिल वाघमारे, अधीक्षक, प्रसारमाध्यम

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू,
नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले



❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,२५०

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ चोवीस तासांचा शिक्षक | प्रवीण दवणे | ५ |
| ❖ देशोदेशीचे शालेय शिक्षण - भविष्याचा वेध घेणारे | अजय काळे | ७ |
| ❖ अन्त्याक्षरांचे इकार-उकार व अकारान्त तीन अक्षरी शब्दांचे लेखन | सलिल वाघमारे | १० |
| ❖ शैक्षणिक गुणवत्तावाढीचा नंदादीप | अरविंद देशपांडे | १४ |
| ❖ कच्छ : भारतातील उपेक्षित भूभाग | डॉ. लतिका भानुशाली | १६ |
| ❖ शब्दमंथन | माधव राजगुरू | २२ |
| ❖ 'भ' भाषेचा! | चारुता प्रभुदेसाई | २३ |
| ❖ आता उजाडेल! | जयश्री काटीकर | २६ |
| ❖ भाषिक खेळ | लक्ष्मण शेडगे | २९ |
| ❖ यशोगाथा | नारायण शिंदे | ३० |
| ❖ माझी शाळा, माझी परसबाग | भीमराव शिंदे | ३३ |
| ❖ उपक्रमातून गुणवत्तावाढीकडे : एक मूल, एक झाड | भागीनाथ बडे | ३४ |
| ❖ मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना (क्रमशः) | डॉ. द. वि. चिक्करमने | ३७ |
| ❖ इतिहासाच्या पानांवरून | श्रीकांत चौगुले | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....✍



मित्रांनो !

सन २०२३ या नववर्षातील 'जीवन शिक्षण'चा पहिला अंक आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. येणारा प्रत्येक क्षण आपल्यासाठी नवाच असतो. २०२३ या नववर्षात आपण नवीन शैक्षणिक उपक्रम हाती घेण्याचा संकल्प करून या वर्षाचे स्वागत करूया. हे उपक्रम अर्थातच गुणवत्तावाढीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपयोगी ठरतील. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण-2020 च्या अंमलबजावणीचे वेध आपणा सर्वांना लागले आहेत. त्यासाठी सर्वच स्तरांवर जोरदार तयारी सुरू आहे. त्यातही शिक्षक बंधू-भगिनींची भूमिका महत्त्वाची आहे.

आपल्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू हा विद्यार्थी आहे; म्हणून शालेय वयात केवळ अभ्यास नव्हे, तर इतरही पैलू महत्त्वाचे ठरतात. खेळ, संगीत, नाटक, वाचन इत्यादी छंद, मैत्रभाव, संविधानिक मूल्ये या पैलूंमुळे उद्याचा जबाबदार नागरिक घडणार आहे. त्यामुळे शालेय स्तरावर या उमलत्या वयातील विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना केवळ घोकंपट्टी न करता संकल्पना समजून घेऊन त्यांचे उपयोजन करण्यासाठी प्रवृत्त करणेही आवश्यक आहे.

सन २०२० व २०२१ या दोन वर्षांत मागे पडलेला अभ्यास भरून काढणे हे मागच्या वर्षातले शिक्षकगणांसमोरचे मोठे आव्हान होते. यासाठी ब्रीज कोर्सची निर्मिती आपण केली. या वर्षी संकल्पनात्मक अभ्यासावर भर देत वाचनसिद्धी उपक्रम शिक्षक-विद्यार्थ्यांच्या मदतीला येणार आहेत. यात मुलांना वाचनाबरोबर अर्थ कसा समजून घ्यायचा यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. मराठी भाषेत अभिधा, लक्षणा, व्यंजना या तीन शब्दशक्ती सांगितल्या जातात. मुलांना वाक्यांचा अर्थ या शब्दशक्तींच्या संदर्भात कसा लावायचा हे वाचनाच्या सरावातून समजून सांगणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सामाजिक शास्त्रासाठी पूरक वाचन कसे उपलब्ध करून देता येईल याचाही प्रयत्न 'जीवन शिक्षण' मासिकाच्या पुढील अंकांपासून केला जाणार आहे.

जानेवारी २०२३ च्या अंकात चोवीस तासांचा शिक्षक, विविध देशातील शिक्षण, मराठी शुद्धलेखन, शैक्षणिक गुणवत्तावाढ, भूगोल, भाषा शिक्षण, परसबाग, एक मूल-एक झाड, मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षण व इतिहासाच्या पानांवरून इत्यादी विविध विषयांवरील लेख देण्यात आले आहेत. विद्यार्थी, शिक्षक व पालकांना हे लेख उपयुक्त व मार्गदर्शक ठरतील असा मला विश्वास आहे.

आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
तथा
संपादक, जीवन शिक्षण

# चोवीस तासांचा शिक्षक

**प्रवीण दवणे**
ज्येष्ठ लेखक
भ्रमणध्वनी : ९९२०३८९४१४

आपण व्यावहारिक सोयीसाठी ‘फूल टाइम’, ‘पार्ट टाइम’, ‘घड्याळी तासिके’ वर मी काम करतो; असे म्हणतो. अर्थात् त्यातला ‘व्यवहार’ महत्त्वाचा असल्यामुळे तसे म्हणणे योग्यच; पण मला जरा वेगळ्या आणि व्यापक अर्थाने म्हणायचे आहे, खरा शिक्षक हा समग्र चोवीस तास शिक्षकच असतो आणि हीच आपल्या व्यवसायाची व्यापकता आहे. त्याच्या अध्यापनाचे ‘मोल’ जसे कोणी करू शकत नाही. तसे त्याच्या व्यावसायिक वेळेची लांबी-रुंदी घड्याळात आणि कॅलेंडरमध्ये बंदिस्त करता येत नाही.

कदाचित माझे हे म्हणणे बुचकळ्यात टाकणारे वाटेल; पण काही उदाहरणे व घटना यातूनच ‘चोवीस तासांचा शिक्षक’ मला उलगडता आला.



दिवाळीच्या सुट्टीत मला कॉलेजच्या ग्रंथालयात बघून, एक ‘सिनिअर’ प्राध्यापक जे त्यांच्या पदोन्नतीच्या कामानिमित्ताने आले होते; त्यांनी विचारले, ‘‘हे काय? सुट्टी चांगली एन्जॉय करायची सोडून, लायब्ररीत काय वेळ फुकट घालवताय?’’ मित्रवर्यांचा प्रश्न ऐकूनच मला प्रश्न पडला. त्यांना नेमके काय म्हणायचे होते? फार खोलात न जाता मी एवढेच म्हणालो, ‘‘सर, मी दिवाळीची सुट्टीच तर ‘एन्जॉय’ करतोय!’’ त्यांनी बिचारा ‘कवी’ आहे झालं, अशा नजरेने माझ्याकडे पाहिले आणि आपले फुगीर खांदे उडवीत ते निघून गेले.

शिक्षकाचा ‘मोकळा’ वेळ, हाच त्याचा ‘भरण्याचा’ वेळ असतो. ते भरून घेतलेलेच तो वर्गात ‘व्यक्त’ करतो; पण वाचनाच्या ओंजळीतून आत जर काही

> “ *प्रत्येक क्षणी नवीन काही शिकायला मिळते; म्हणून माणसाने नेहमी विद्यार्थ्याच्या मनोभूमिकेतून शिकत राहिले पाहिजे. ही वृत्ती शिक्षकांनी जोपासली पाहिजे आपण कायम शिक्षक आहोत, असे समजून शिक्षकांनी नवीन नवीन गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत. शाळेला मिळणाऱ्या मोठ्या सुट्टीत हे सहज शक्य आहे. नित्य वाचन करत राहिल्यास, ते विद्यार्थ्यांनाही नवीन काही शिकवू शकतील. यातून शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत होत राहील.* ”

भरलेच नाही, तर पुढे फक्त तोंड हलते; पण शब्दांत हृदयाचे स्पंदन येत नाही. हवा फक्त मुळाक्षरे गिरवीत राहते. या हृदयातून त्या हृदयापर्यंत पोहोचवायला हे ‘हृदय’ भरायला तर हवे ना! म्हणूनच म्हटले; इतरांचा जो मोकळा वेळ असतो, त्या वेळेचाच रांजण करून त्यात ‘जीवन’ कसे भरायचे ते काळजाचा शिक्षक ठरवतो. वेळेला ‘अवकाश’ हा एक अतिशय समर्पक शब्द आहे. ‘अवकाश’ – आकाश! जेवढी उंच भरारी घेऊ, तेवढे अवकाश स्वीकारते. नवे अवकाश दाखवते. वेळेचे तसेच आहे. जेवढे आत भरून घेऊ, तेवढी ती भरू देते. रात्रीच्या काळोखात, मृत्तिकेची शाल पांघरलेली झाडाची मुळे रसशक्ती टिपून त्यातून झाडे हरित करतात. डहाळ्यांना कळ्या येतात; मग कळ्यांची फुले आणि मग भुकेल्या पोटाला फळे मिळतात, त्याचे कारण झाडाच्या मुळांत असते. तसेच शिक्षकाचे ज्ञानसधन होण्याचे मूळ सुट्टीचा त्याने केलेला सदुपयोग यात असते. शिक्षक जेवढा

गच्च भरलेला, तेवढी पुढची पिढी भाग्यवान! वर्गातल्या यज्ञाचे वर्गमूळ शिक्षकाच्या ज्ञानोत्सुकतेत असते.

पुष्कळांना असे वाटते; आता नवे शिकून उपयोग काय? खरे तर या प्रश्नाच्या उत्तरासाठीच नवीन शिकायचे असते. झाडाला घातलेल्या पाण्याच्या नेमक्या कुठल्या थेंबाचे फूल होते, हे सांगता येत नाही. तसेच आहे, आपण काय शिकतो, वाचतो, पाहतो, ऐकतो यातल्या कुठल्या संचिताचे फूल होणार आहे, हे सांगता येणार नाही. सुट्टी किंवा शाळेच्या नेहमीच्या तासिकांव्यतिरिक्तचा आपला वेळ स्वतःला समृद्ध करण्याच्या व्यासंगातच जायला हवा. व्यासंग संपला, की शिक्षकपण ओसरत जाते, उरते फक्त हमाली! माहितीचे ओझे इकडून तिकडे टाकणारी! हाडाचा शिक्षक आणि व्रतस्थ वृत्तीचा विद्यार्थी दोन्हीही घडत जाणे हेच खरे अध्यापन!

पंचवीस वर्षांपूर्वीची पदवीधर असून, जर पुढे नवीन अद्ययावत वाचनच केलेले नसेल, तर इयत्ता खाली येते. फक्त मुळाक्षरे वाचत किंवा दहा वर्षे जुन्या टिपणांच्या वह्या पुन्हा वर्गात दरवर्षी 'डिक्टेट' करीत राहून, मुलांच्या वह्या फार तर भरतील; पण मुलांची मने?' ती मात्र रिकामीच राहतील; म्हणून रिकामा वेळ बहरून टाकण्याची संधी म्हणजे शिक्षकांची सुट्टी. काही वर्षांपूर्वीची एक गमतीदार, पण गंभीर आशय सुचवणारी घटना मला आठवते. माझ्या वर्गात प्रसाद नावाचा एक बुद्धिमान विद्यार्थी होता. एकदा बोलता बोलता तो म्हणाला, ''सर, आपल्या चव्हाण सरांच्या घरी जाऊन मला एकदा त्यांची नोट्सची वहीच पळवून आणायची आहे!''

त्याच्या चेहऱ्याकडे मी बघतच राहिलो, असे काय बोलतोय हा? चव्हाण सरांची नोट्सची वही याला का बरे पळवायची असेल?

तसे माझ्या चेहऱ्यावरचे भाव टिपत स्वारी म्हणाली, ''सर, प्रत्यक्षात नाही; पण कल्पनेत तरी वाटते, अशी वही पळवून आणावी. का, तर त्यांची जुनीपुराणी कधी काळची तीच वही, ते आमच्या डोक्यात उतरवत असतात. वर्गात आले रे आले, की ती वही त्यांनी उघडायची; मग आम्ही आमच्या वह्या उघडायच्या, ते वाचत वाचत डिक्टेट करणार आणि आम्ही खाली मान घालून मुकाट्याने लिहून घेणार. केव्हा तरी वाटतंच ना, एखाद्या विशिष्ट मुद्द्यावर सरांनी मनमोकळं बोलावं, चर्चा करावी; पण ते काही नाही, आले की दे लिहून.'' प्रसादच्या बोलण्यात तथ्य होतं. वर्ग आपल्या 'कंट्रोल' मध्ये राहावा म्हणून पुष्कळ शिक्षक फक्त शिळा मजकूर ताजा करीत 'फिर वही नोट्स लाया हूँ' चा फंडा वापरतात.

शिकवणारेही कंटाळलेले, तर शिकणारे कसे उत्साही असणार. अशा तीस-पस्तीस वर्षांच्या खर्डेघाशीत अध्यापनाची रंगतच हरवते. याचे कारण अध्यापन हा आपला केवळ पोट भरण्याचा व्यवसाय आहे, असेच काही जण मानतात. मग पार्ट टाइम हे कर, पार्ट टाइम इस्टेट एजंटचे काम कर, पार्ट टाइम टुरिस्ट गाड्या भाड्याने देण्याचे काम कर अशा गोष्टींत अध्यापकाचे डोके व्यग्र होते. शिक्षकांचा समांतर व्यवसायही शिक्षणाशीच संबंधित असावा. शिक्षक हा चोवीस तासांचा अखंड शिक्षकच असतो. त्यात कसूर झाली, की मिळणारा आनंदही तसाच असणार याची खात्री बाळगा.

शिक्षक हीसुद्धा 'वृत्ती' आहे. अध्ययन व अध्यापन हा आपला स्वभाव व्हायला हवा. वाचन-श्रवण या शिक्षकांच्या दोन नाकपुड्या आहेत. प्रयोगशीलता हा त्याचाच महत्त्वाचा परिणाम आहे. प्रयोग हे वर्गातल्या निकडीप्रमाणे होत जातात, केले जातात असे म्हणण्यापेक्षा ते आंतरिक प्रेरणेने होऊन जातात. प्रेरणावृत्तीने जो प्रत्येक क्षणी साधक आहे, त्यालाच नवे प्रयोग सुचतात. त्याचा आनंद हीच एक समाधी असते आणि व्यवसायात तल्लीन होणे, एकरूप होणे, यापेक्षा आयुष्याची कृतार्थता ती कोणती?

❑❑❑

# देशोदेशीचे शालेय शिक्षण– भविष्याचा वेध घेणारे

**अजय काळे**
जि. प. शाळा दहिवडी, ता. तासगाव, जि. सांगली
भ्रमणध्वनी : ९९२१६८९४६८

*२१ देशांच्या शालेय शिक्षणाची माहिती देणारे 'देशोदेशीचे शालेय शिक्षण' हे पुस्तक. 'तुलनात्मक शिक्षणशास्त्र' या ज्ञानशाखेतील मराठीतील बहुधा पहिलेच पुस्तक असावे. या पुस्तकात भारतासह जगातील २१ देशांच्या शालेय शिक्षणपद्धतींविषयीच्या माहितीचा समावेश आहे. याबाबतची संक्षिप्त माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.*

'देशोदेशीचे शालेय शिक्षण'हे पुस्तक हाती येताच पहिले लक्ष जाते ते आभा भागवत यांनी काढलेल्या वैशिष्ट्यपूर्ण व आशयगर्भ अशा मुखपृष्ठावर. मला आठवते, की माझी आजी वर्षभर कापडाचे विविध रंगांचे तुकडे जपून ठेवायची आणि वर्षाच्या शेवटी ते सर्व तुकडे एकत्र जोडून त्याची 'वाकळ'(गोधडी) तयार करायची. त्यावेळी त्या चिंध्या न राहता त्याचे एक उबदार अशा वस्त्रात रूपांतर व्हायचे. अगदी याप्रमाणेच 'देशोदेशीचे शालेय शिक्षण'हे पुस्तक तयार झाले आहे. याची प्रचिती वाचकांना मुखपृष्ठावरूनच येते. देशोदेशीच्या मुलांना एकत्रितपणे वाचकांच्या समोर उभे करण्यात आभा भागवत यशस्वी झाल्या आहेत.

'तुलनात्मक शिक्षणशास्त्र'या ज्ञानशाखेतील मराठी भाषेतील बहुधा हे पहिलेच पुस्तक. 'देशोदेशीचे शालेय शिक्षण' या पुस्तकाची रचना ही तीन भागांत केली आहे. पहिल्या भागात 'शिक्षण विकास मंच' चे मुख्य संयोजक व माजी शिक्षण संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी 'तुलना' ही प्रगतीला अडथळा अथवा मारक न ठरता, तारक कशी ठरते, हे अत्यंत अभ्यासपूर्ण व मुद्देसूदपणे मांडले आहे. विविध देशांच्या शिक्षणपद्धतीत 'तुलना करणे' हे शिक्षणशास्त्रामध्ये आवश्यक का आहे हे सांगताना, तुलना ही मानवी जीवनाचे आणि शिक्षणाचे एक अविभाज्य अंग कसे आहे याची सविस्तर चर्चा ते पहिल्या प्रकरणात करतात. त्यामुळे वाचकांना त्यांची विचारबैठक पक्की करण्यास मदत होते.




शिक्षणशास्त्र विषयाचे अभ्यासक व संशोधक किशोर दरक यांनी 'तुलना' ही पावलोपावली होत असताना त्याकडे पुरेशा गांभीर्याने लक्ष न दिल्यास, शिक्षणक्षेत्रात कोणत्या समस्या निर्माण होऊ शकतात हे 'शिक्षणाच्या तुलनेची समस्या' या प्रकरणात सविस्तर दिले आहे. 'तुलना' हा शिक्षणक्षेत्राच्या भूतकाळाचा आणि वर्तमानाचा स्थायीभाव आहे. यातूनच तुलनात्मक शिक्षणशास्त्र ही

नवीन विद्याशाखा उदयास येत आहे. येथे केवळ दोन विद्याशाखांची, अभ्यासक्रमांची अथवा शालेय रचनांची तुलना असा ढोबळ अर्थ घेऊ नये, तर तुलना का करायची आहे हेच स्पष्ट असायला हवे; तरच योग्य मार्गाने आपण जाऊ शकू. अन्यथा पोकळ अभिमान व गोंधळलेली स्थिती या पलीकडे हाती फारसे काही लागणार नाही. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाने हे प्रकरण वाचलेच पाहिजे असे मला वाटते. आपला विषय मार्मिक व तार्किकपणे पोहोचवण्यात किशोर दरक यशस्वी झाले आहेत.

माजी शिक्षण संचालक डॉ. वसंत काळपांडे यांनी तिसऱ्या प्रकरणात भारतीय शालेय शिक्षणाचा पट मांडला आहे. एका बाजूला अतिशय समृद्ध असा ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक व सामाजिक आव्हाने आहेत. ती स्वीकारून भारतीय समाज वाटचाल करत आहे. भारत हा तरुणांचा देश म्हणून उदयाला येत असताना, जर त्यास योग्य त्या शैक्षणिक संधी उपलब्ध झाल्या नाहीत, तर देशाची अपरिमित हानी होऊ शकेल. यादृष्टीने भारतातील शालेय शिक्षणाचा इतिहास, सद्यःस्थिती व भविष्यकाळ कसा असला पाहिजे यावर डॉ. वसंत काळपांडे यांनी प्रकाशझोत टाकला आहे. शिक्षणक्षेत्रातील आपल्या आजवरच्या अनुभवांतून भारतीय शालेय शिक्षणाचा पट वाचकांसमोर मांडण्यात लेखक यशस्वी झाले आहेत.

देशोदेशीच्या शिक्षणपद्धतींचा मागोवा घेत असताना या अभ्यासाला एक तात्त्विक व तौलनिक आधार असावा यादृष्टीने किशोर दरक यांचा आणि यास संतुलित भारतीय संदर्भ राहावा यादृष्टीने डॉ. वसंत काळपांडे यांचा हे दोन्ही लेख या पुस्तकास वैचारिक अधिष्ठान मिळवून देतात.

'सबके लिए खुला है, मंदिर यह हमारा'या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ओळीने दुसऱ्या विभागाची सुरुवात होते. एकूण विषयाचा आवाका पाहता संपादक मंडळाने या काव्यपंक्तीची योजना करून 'आओ कोई भी, सबके लिए खुला है, मंदिर यह हमारा'असा संदेश देऊन भविष्यात या विषयावर काम करण्यास प्रेरित केले आहे.

'देशोदेशीचे शालेय शिक्षण' या पुस्तकाची सुरुवात ही अमेरिका खंडातील शिक्षणपद्धतीने होते. शिक्षण, व्यवसाय आणि कायमस्वरूपी वास्तव्य यासाठी जगभरातील लोकांचे आकर्षण असलेला अमेरिका हा देश. या देशातील बालस्नेही म्हणावी अशी शासकीय शिक्षणव्यवस्था तिथे सर्वांसाठी उपलब्ध आहे. स्थानिक मुलांप्रमाणेच स्थलांतरित पालकांच्या मुलांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणाऱ्या या शिक्षणव्यवस्थेतून घेण्यासारखे बरेच आहे. अमेरिकेत नव्याने स्थायिक होताना त्या व्यवस्थेचा संशोधक-शिक्षक-पालक या नात्याने शुभांगी विखे, प्रीती कामत-तेलंग व मच्छिंद्र बोऱ्हाडे यांनी घेतलेला शालेय शिक्षणाचा वेध महत्त्वपूर्ण आहे. अमेरिका खंडाच्या शालेय शिक्षणात मुक्त व्यवस्था, सहिष्णू आणि उदार धोरणांचे प्रतिबिंब दिसते.

समाजातील सर्व, विशेषतः अन्यायग्रस्त गटांना शाश्वत स्वरूपात चांगले जीवन, त्यासाठी चांगले शिक्षण मिळवून देण्याच्या दक्षिण आफ्रिकेच्या अवघड प्रयत्नांचा अभ्यासपूर्ण मागोवा घेऊन मिया निक्सन, डॉ. कथबर्ट डुटिरो व उषा राणे यांनी वसाहतवाद व वंशभेद या पार्श्वभूमीवर मात करून दक्षिण आफ्रिका हा देश आज आफ्रिका खंडातच नव्हे, तर जागतिक स्तरावरही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे आपल्या लेखात मांडले आहे. शिक्षणव्यवस्थेचा, त्यात सुधारणा करण्याचा सरकारी तसेच खाजगी प्रयत्नांचा एक आशावादी आढावा घेतला आहे.

आशिया खंडातील शिक्षणपद्धतीची सुरुवात ही इस्त्राईल या देशापासून होते. विस्ताराने मोठ्या

असलेल्या आशिया खंडातील ओमान, चीन, जपान, दक्षिण कोरिया, पाकिस्तान, मलेशिया व मंगोलिया या आशियायी देशांतील शालेय शिक्षणाचा आढावा डॉ. अपर्णा लळिंगकर, मिलिंद चिंदरकर, शिवकन्या शशी, हुइलिंग वांग, जेन लिऊ, डॉ. प्राजक्ता भावे–खरे, धनवंती हर्डीकर, मुख्तार खान, डॉ. मधुरा फडके, देविदास देशपांडे व दाशदोर्ज यागान यांनी घेतला आहे. इस्राईल, जपान, चीन, सिंगापूर, द. कोरिया आदी प्रगत राष्ट्रातील शालेय शिक्षणाच्या माहितीबरोबरच आपल्या देशासोबत स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानच्या शिक्षणपद्धतीची सद्यः स्थिती वाचकांना या पुस्तकामुळे माहिती होते. आशिया खंडातील शालेय शिक्षणाचा आढावा घेणारे सर्वच लेख वाचकांच्या ज्ञानलालसेची भूक भागवताना दिसतात.

ऑस्ट्रेलिया या देशातील प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यावरील महत्त्वाची मूल्ये, एकूण जीवनशैली आदींबाबत शुभदा चौकर यांनी तेथे वास्तव्याला असणारे डॉ. विजय जोशी आणि डॉ. भारती पार्डीकर यांच्याशी चर्चा करून अत्यंत प्रभावीपणे ऑस्ट्रेलियातील शिक्षणपद्धतीचा आढावा घेतला आहे.

नेदरलँड्सची 'माणूस' घडवणारी शिक्षणपद्धती पासून आपला युरोप खंडाचा प्रवास होतो. पुढे आपणास ज्या शिक्षणपद्धतींनी पूर्ण जगाला भुरळ पाडली आहे त्या फिनलंडच्या शिक्षणपद्धतीची माहिती डॉ. हेरंब कुलकर्णी आणि डॉ. शिरीन कुलकर्णी देतात. यू. के. च्या शालेय शिक्षणपद्धतीचा डॉ. राजीव बेनोडेकर, दिलीप आमडेकर आणि डॉ. माधवी आमडेकर यांनी धावता आढावा घेतला आहे. बसंती रॉय यांनी या तीन लेखकांची मुलाखत घेऊन आपणासमोर तपशील मांडला आहे. सोव्हिएत काळात लहान मुलांचे शालेय शिक्षण व नव्या राजकीय, सामाजिक, आर्थिक रचनेकडे वाटचाल करताना होणाऱ्या बदलांचा संक्षिप्त स्वरूपातील आढावा डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी 'रशिया–परिवर्तनाकडे वाटचाल' या लेखात घेतला आहे. समतेवर आधारित शिक्षणप्रणाली 'स्वित्झर्लंड' मध्ये कशी विकसित झाली आणि तेथील शालेय शिक्षणाचे आज दिसणारे अनुकरणीय स्वरूप याबाबतचे विजय जोशी यांचे हे विस्तृत विवेचन प्रस्तुत लेखात आले आहे, तर समृद्ध लोककल्याणकारी देश म्हणून उदयास आलेल्या 'स्वीडनची शालेय शिक्षणपद्धती' शुभदा चौकर यांनी अनेक अनुभवांच्या आधारे उलगडून दाखवली आहे.

या पुस्तकाच्या तिसऱ्या भागात कोरोना काळ व कोरोनानंतर जागतिक स्तरावर सर्वच देशांनी योजलेले उपाय, स्वीकारलेले मार्ग यांचा संख्याशास्त्रीय आणि वस्तुनिष्ठ आढावा अजित तिजोरे यांनी आपल्या लेखात मांडून पुढे उचलण्याची काही पावलेही सुचवली आहेत. ती शालेय शिक्षणाचे धोरण ठरवताना नक्कीच उपयोगी ठरतील.

भारत हा तरुणांचा देश म्हणून उदयास येत असताना व जागतिक स्तरावर आपल्या देशाचे विविध स्तरांवर वाढत चाललेले महत्त्व पाहता यास सक्षम अशी पिढी घडवणारे शालेय शिक्षण योजताना या पुस्तकात आलेले पाच खंड व भारतासह एकवीस देशांच्या शालेय शिक्षणपद्धतींचा थोडा तरी हातभार लागला तरी या पुस्तक निर्मितीचा हेतू साध्य होऊ शकेल असा आशावाद समारोपात धनवंती हर्डीकर यांनी व्यक्त केला आहे.

देशोदेशीचे शालेय शिक्षण हे पुस्तक वाचत असताना प्रत्यक्ष लेखक आपल्याशी संवाद साधत असल्याचे जाणवते. हेच या पुस्तकाचे प्रधान वैशिष्ट्य आहे. कुठेही आपण एखादा ग्रंथ वाचत असल्याचे जाणवत नाही. अत्यंत सहज सुंदर व ओघवत्या शैलीत सर्व लेख आले आहेत. मुळात सोळा भागांच्या संवाद मालिकेचे पुस्तक करताना संवादाचा नैसर्गिक बाज कुठेही हरवणार नाही याची काळजी डॉ. धनवंती हर्डीकर,

**(पृष्ठ क्र. २२ वर)**

# अन्त्याक्षरांचे इकार-उकार व अकारान्त तीन अक्षरी शब्दांचे लेखन

**सलिल वाघमारे**
पुणे
भ्रमणध्वनी : ९८२०४४१५१३

**(मराठी प्रमाणलेखन नियम : लेख - ३)**

*बोलणे आणि लिहिणे यात फरक असतो. बोलतो तसे लिहिले जात नाही; कारण लिखित भाषेला नियम असतात, त्यानुसार लिहिणे बंधनकारक असते. लिहिताना शब्दांतील 'इ'कार, 'उ'कार यांच्या बाबतीत चुका होतात. अशा चुका होऊ नयेत, या दृष्टीने शब्दांच्या उदाहरणांद्वारे विशेष मार्गदर्शन या लेखातून केले आहे.*

मराठीतील सर्व शब्दांचे अन्त्य इकार व उकार दीर्घ लिहावेत असा नियम आहे. मराठीतील सर्व इकार-उकारयुक्त शब्द, तसेच संस्कृतमधून आलेले तत्सम ऱ्हस्वान्त शब्दसुद्धा मराठीमध्ये सुटे लिहिताना दीर्घान्त लिहावेत; कारण त्यांचा मराठीमध्ये उच्चार दीर्घान्त होतो. थोडक्यात मराठी अथवा इतर भाषांमधील इकार-उकारयुक्त शब्द मराठीत दीर्घान्तच लिहावेत.

**काही व्याकरणिक संज्ञांचे स्पष्टीकरण :**

(१) **अन्त्याक्षर** म्हणजे शब्दाचे शेवटचे अक्षर.

(२) **दीर्घान्त शब्द** म्हणजे शब्दातील शेवटच्या अक्षराची वेलांटी अथवा उकार दीर्घ असणे.

(३) **दीर्घ इकार** म्हणजे दुसरी वेलांटी ( ी ) तर ऱ्हस्व इकार म्हणजे पहिली वेलांटी ( ि ) होय.

(४) **दीर्घ उकार** म्हणजे दुसरा उकार ( ू ) तर ऱ्हस्व उकार म्हणजे पहिला उकार ( ु ) होय.

(५) **तत्सम शब्द** म्हणजे संस्कृतमधून जसेच्या तसे म्हणजेच त्यांच्या रूपात कोणताही बदल न होता मराठीत आलेले शब्द.

(६) **तद्भव शब्द** मूळ संस्कृतमधून मराठीमध्ये येताना त्यांच्या रूपात काही बदल होऊन आलेले शब्द.

**(१) दीर्घ इकारान्त शब्द :**

की, मी, जी, ती, ही, कळशी, काठी, काडी, काकडी, कारागिरी, करंगळी, गारदी, गुराखी, चपाती, चुलती, माती, मुलगी, धमकी, टोपी, पगडी, पिशवी, फांदी, पुतणी, मुलगी, घरगुती, चंद्रमौळी, तबकडी, थकबाकी, नजरबंदी, महागाई, मालवणी, वरकरणी, वारकरी.

**(२) दीर्घ उकारान्त शब्द :**

तू, शू, भू, आगाऊ, उडाणटप्पू, ऐतखाऊ, काजू, चेंडू, चिटपाखरू, झोपाळू, दयाळू, पायाळू, पोटभरू, फूलपाखरू, भाडेकरू, मनमिळाऊ, मायाळू, लाडू, वाळू, वासरू, वाटसरू, शिंगरू, साडू, सुकाणू, हसू.

**काही क्रियापदे :** ओढू, खाऊ, जाऊ, गाऊ, ओळखू, खणू, गाजवू, घेऊ, जिंकू इत्यादी.

**(३) तद्भव शब्द :**

तद्भव शब्द म्हणजे मूळ संस्कृत शब्द मराठीत येताना त्यांच्यात काही बदल झालेले आहेत असे शब्द होय. तद्भव शब्दांना मराठीचे नियम लागून ते दीर्घान्त होतात. उदाहरणार्थ, जीवाणु : जिवाणू, वसति : वस्ती, विनति : विनंती, हस्तिन् : हत्ती इत्यादी.

(४) **'ही'** हे अव्यय मूळ संस्कृतमध्ये ऱ्हस्वान्त असल्यामुळे पूर्वी ते ऱ्हस्वान्तच लिहिले जात असे. ते आता मराठीत लिहिताना दीर्घान्त लिहावे. 'ही' हे अव्यय लागताना मूळ शब्दात कोणताही बदल होत नाही. तसेच ते कोणत्याही शब्दाला लागू शकते. थोडक्यात, 'ही' हे अव्यय शब्दाच्या शेवटी किंवा विभक्तिप्रत्यय, शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी मध्येच आले असले तरी ते दीर्घान्त लिहावे. उदाहरणार्थ, मलाही, माझ्यासाठीही, माझ्याहीपेक्षा.

(५) **तत्सम शब्द :**

मूळ ऱ्हस्वान्त संस्कृत तत्सम शब्द मराठीत सुटे लिहिताना दीर्घान्त होतात.

उदाहरणार्थ,

| | | | |
|---|---|---|---|
| अरि | : अरी | अश्रु | : अश्रू |
| अस्थि | : अस्थी | कवि | : कवी |
| कुलपति | : कुलपती | बाहु | : बाहू |
| बिन्दु | : बिन्दू (बिंदू) | भक्ति | : भक्ती |
| भीति | : भीती | भूमि | : भूमी |
| भूमिति | : भूमिती | मति | : मती |
| मूर्ति | : मूर्ती | मणि | : मणी |
| मनु | : मनू | प्रगति | : प्रगती |
| धुमकेतु | : धुमकेतू | धेनु | : धेनू |
| निवृत्ति | : निवृत्ती | बुद्धि | : बुद्धी |
| पशु | : पशू | सहिष्णु | : सहिष्णू |
| परमाणु | : परमाणू | प्रशस्ति | : प्रशस्ती |
| रूढि | : रूढी इत्यादी. | | |

**टीप :** सर्व मराठी इकार-उकारयुक्त शब्द, तद्भव शब्द, इतर भाषेतून आलेले शब्द, ऱ्हस्वान्त संस्कृत शब्द सुटे आल्यास मराठीमध्ये दीर्घान्त लिहावेत. या शब्दांना विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागताना तसेच मराठी सामासिक शब्दात प्रथमपदी आलेले शब्दसुद्धा दीर्घान्तच राहतात. उदाहरणार्थ,

**मराठी शब्द :**

काकडी : काकडीचा, काकडीमध्ये,
चपाती : चपातीत, चपातीमध्ये,
धमकी : धमकीला, धमकीमध्ये,
पगडी : पगडीची, पगडीमधील,
करंगळी : करंगळीचा, करंगळीसाठी,
तबकडी : तबकडीत, तबकडीजवळ.

**संस्कृत शब्द :**

कवि : कवीला, कवीसाठी,
अश्रु : अश्रूचा, अश्रूमधील,
अस्थि : अस्थीची, अस्थीसाठी,
कुलपति : कुलपतींचा, कुलपतींसाठी,
भक्ति : भक्तीचा, भक्तीमधील,
भीति : भीतीने, भीतीमुळे,
भूमि : भूमीचा, भूमीसाठी,
भूमिति : भूमितीचा, भूमितीकरिता,
मूर्ति : मूर्तीला मूर्तीकडे,
प्रगति : प्रगतीचा, प्रगतीमुळे,
बुद्धि : बुद्धीचा, बुद्धीसाठी,
पशु : पशूला, पशूमुळे,
प्रशस्ति : प्रशस्तीला, प्रशस्तीकरिता इत्यादी.

मूळ संस्कृत ऱ्हस्वान्त शब्द सामासिक शब्दात प्रथमपदी आल्यास मात्र ते मुळाप्रमाणे ऱ्हस्वान्त होतात.

उदाहरणार्थ,

कवि : कविकल्पना, अश्रु : अश्रुपात,

अस्थि : अस्थिपंजर इत्यादी.

याबाबतची सविस्तर माहिती आपण स्वतंत्र प्रकरणामध्ये पाहू.

कवि (संस्कृत) : कवी (मराठी) – कवीला (विभक्तिप्रत्ययान्त) – कविकल्पना (सामासिक शब्दात प्रथमपदी)

(६) '–ईक' हा मराठी प्रत्यय लागून होणारी धातूसाधिते लिहिताना त्यातील उपान्त्य इकार दीर्घ होतात. उदाहरणार्थ, खर्च : खर्चीक, पड : पडीक इत्यादी.

(७) '–ईत हा मराठी प्रत्यय लागून होणारी धातूसाधिते लिहिताना त्यातील उपान्त्य इकार दीर्घ होतात. उदाहरणार्थ, चकचक : चकचकीत, लखलख : लखलखीत इत्यादी.

(८) '–ईन' हा संस्कृत प्रत्यय धातूंखेरीज इतर तत्सम शब्दांना पररूपसंधीने लागून विशेषणे तयार होतात, या विशेषणांतील उपान्त्य इकार दीर्घ लिहावे. उदाहरणार्थ, कुल : कुलीन, नव : नवीन इत्यादी.

(९) 'ईय' हा संस्कृत प्रत्यय तत्सम, नामांना तत्सम शब्दांना पररूपसंधीने लागून 'तेथील', 'त्याठिकाणचा' अशा अर्थाची विशेषणे तयार होतात, या विशेषणांचे उपान्त्य इकार दीर्घ लिहावे. उदाहरणार्थ, भारत : भारतीय, राष्ट्र : राष्ट्रीय, कुटुंब–कुटुंबीय इत्यादी.

**अपवाद :**

(१) मराठी : नि (एकाक्षरी) तसेच आणि (दोनाक्षरी) ही दोन मराठी उभयान्वयी अव्यये ऱ्हस्वान्त लिहावीत. या दोन शब्दांचा अपवाद वगळता मराठीमधील कोणताही शब्द ऱ्हस्वान्त लिहू नये.

(२) संस्कृतमधील खालील क्रियाविशेषण अव्यये मुळात ऱ्हस्वान्त आहेत, ती मराठीत लिहितानाही त्यांच्यात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे ती मुळाप्रमाणे ऱ्हस्वान्तच लिहावीत.

अति, अद्यापि, इति, कदापि किमपि, किंतु, तथापि, परंतु, प्रति, प्रभृति, यद्यपि, संप्रति ही क्रियाविशेषण अव्यये ऱ्हस्वान्त लिहावीत. तसेच यथातिथि, यथानिधि, यथापद्धति, यथाबुद्धि, यथामति, यथारुचि, यथाविधि, यथाशक्ति ही 'यथा–' हा उपसर्ग लागून तयार झालेली संस्कृत तत्सम ऱ्हस्वान्त क्रियाविशेषण अव्ययेसुद्धा मराठीतही ऱ्हस्वान्त लिहावीत.

(३) 'प्रति' (कडे याअर्थी) हे क्रियाविशेषण अव्यय ऱ्हस्वान्त लिहावे तसेच शब्दयोगी अव्यय म्हणूनही ऱ्हस्वान्तच लिहावे. उदाहरणार्थ, शिक्षकांप्रति, देशाप्रति इत्यादी. प्रती या दीर्घान्त शब्दाचा अर्थ नक्कल, प्रतिलिपी असा होतो.

(४) आदी, इत्यादी ही दोन अव्यये नसून ती विशेषणे असल्यामुळे ती दीर्घान्त लिहावीत.

संस्कृतमधील काही शब्द मुळात दीर्घान्तच आहेत, असे संस्कृत शब्द मराठीतही दीर्घान्तच राहतात.

उदाहरणार्थ, कुंकू, चमू, धातू, वधू, वस्तू, अंगठी, अघोरी, गर्भिणी, गृहिणी, निर्मिती, पदवी, शरयू, संयमी, सुगंधी, स्वयंभू, यक्षिणी, हरिणी, अणुरेणू, अपमृत्यू, आसावरी, इंद्रायणी, दूरगामी, दैनंदिनी, नीलगिरी, नीलांबरी, पुष्करिणी, महालक्ष्मी, माधुकरी, रूपवती, लीलावती, वीर्यशाली, शीघ्रकोपी, हिमगिरी, कार्यकारिणी, वर्तुळाकृती, वैकुंठचतुर्दशी इत्यादी.

(५) नामांना, सर्वनामांना जोडण्यात येणाऱ्या सर्व विभक्तिप्रत्ययांचे इकार–उकार दीर्घ असतात.

त्यामुळे विभक्तिप्रत्यय जोडलेले सर्व शब्द दीर्घान्त असतात. उदाहरणार्थ, कवी**शी**, कवीं**नी**, कवी**ही**, कवीं**शी**, कवी**ची**, कवीं**ची** इत्यादी.

## अकारान्त तीन अक्षरी शब्दांतील उपान्त्य अक्षराचे लेखन :

अकारान्त तीन अक्षरी शब्दांच्या मधल्या अक्षराचे म्हणजेच उपान्त्य अक्षरांचे इकार–उकार दीर्घ असतात.

उदाहरणार्थ, कंदील, कंजूस, खंजीर, खजूर, खाटीक, खारीक, चिलीम, जमीन, जोखीम, तालीम, गरीब, परीघ, बहीण, बेडूक, बेरीज, माणूस, मैत्रीण, वकील इत्यादी.

या शब्दांना विभक्तीचे प्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यये जोडताना अन्त्याक्षरे अकारान्त न राहिल्यामुळे हे उपान्त्य दीर्घ इकार–उकार ऱ्हस्व होतात. उदाहरणार्थ, कंदील : कंदिलामध्ये, कंजूस : कंजुसासारखे, खंजीर : खंजिरात, खजूर : खजुरासाठी, गरीब : गरिबांना, बहीण : बहिणीसाठी, मैत्रीण : मैत्रिणींना, वकील : वकिलांना परीघ : परिघात, जमीन : जमिनीमध्ये इत्यादी.

काही नामांचे किंवा सर्वनामांचे सामान्यरूप होताना उपान्त्य दीर्घ अक्षर ऱ्हस्व होत नाही. त्याऐवजी दीर्घ इकार, उकार लुप्त होतात. उदाहरणार्थ, खाटीक : खाटकांना, बेडूक : बेडकांचा, माणूस : माणसांचे, खारीक : खारकेचा, बेरीज : बेरजेत, कुलूप : कुलपासाठी, इत्यादी.

मराठीप्रमाणे अकारान्त शब्दातील उपान्त्य अक्षर मुळात दीर्घ असणारे संस्कृत शब्द. हे संस्कृत शब्द मराठीतही तसेच राहतील.

अंगभूत, अधीन, आरूढ, कुटीर, कुरूप, कृतिशील, गंभीर, गृहीत, तांबूल, नवनीत, प्राचीन, मयूर, समीप, समूह, स्वर्गीय इत्यादी.

## अपवाद :

(१) संस्कृत तत्सम तीन अक्षरी काही शब्दांतील मधली अक्षरे म्हणजेच उपान्त्य अक्षरे मुळातच ऱ्हस्व आहेत. ती मराठीतही हस्वच लिहावीत.

उदाहरणार्थ, उचित, अंकुर, खनिज, चकित, गणित, दलित, पंडित, पुरुष, प्रचुर, मंदिर, मधुर, ललित, विधुर, संकुल, क्षितिज, कृत्रिम, फाल्गुन, भंगुर, नूपुर, रुधिर, वरुण, विद्युत, शकुन इत्यादी.

ज्या संस्कृत शब्दांतील उपान्त्य इकार–उकार मुळात ऱ्हस्व आहेत, अशा शब्दांना विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यये जोडताना सामान्य रूपांतील उपान्त्य इकार–उकार मुळातल्याप्रमाणे ऱ्हस्वच राहतात. त्यांच्यामध्ये बदल होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

उदाहरणार्थ, मंदिर : मंदिरात, संकुल : संकुलामध्ये, क्षितिज : क्षितिजाकडे इत्यादी.

(२) नामांना –इक किंवा –इत प्रत्यय लागून तयार होणारी विशेषणे.

**–इक प्रत्यय :**

वेद : वैदिक, स्थान : स्थानिक, धन : धनिक, मास : मासिक, वर्ष : वार्षिक, श्रम : श्रमिक, नाव : नाविक, जीव : जैविक, सेना : सैनिक, लोक : लौकिक, मोल : मौलिक, योग : यौगिक, क्षण : क्षणिक, बीज : बैजिक इत्यादी.

**–इत प्रत्यय :** आधार : आधारित, विकास विकसित, निर्धार : निर्धारित, सुरक्षा : सुरक्षित, संयम : संयमित, संस्कार : संस्कारित, संकलन : संकलित, निलंबन : निलंबित, पराजय : पराजित इत्यादी. (प्रत्ययान्त शब्दांबाबत आपण स्वतंत्र प्रकरणात सविस्तर चर्चा करू.)

❑❑❑

# शैक्षणिक गुणवत्तावाढीचा नंदादीप

**अरविंद देशपांडे**
निवृत्ती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९८२३३५४४९८

*वर्षानुवर्षे परीक्षेवर आधारित गुणवत्ता पारखली जात आहे. हीच पद्धत सुरू आहे. खऱ्या अर्थाने शैक्षणिक गुणवत्ता पारखायची असेल तर ती ज्ञानात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक अंगाने तपासली पाहिजे. असे प्रतिपादन सदर लेखामध्ये करण्यात आले आहे.*

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच आपल्या शिक्षणाचा एकमेव उद्देश. अर्थात, या एका उद्देशामध्ये अनेक उपउद्देश लपलेले आहेत, हे आपणां सर्वांना माहीत आहे. अगदी एका पाठाच्या संदर्भात पाहिले, तर ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य, अभिरुची, रसग्रहण, अभिवृत्ती अशा टप्प्याटप्प्याने उद्दिष्टे वाढत जातात हे आपणांस ज्ञात आहे.

शैक्षणिक गुणवत्ता हा आज परवलीचा शब्द बनला आहे. शैक्षणिक गुणवत्ता म्हणजे काय? दुर्दैवाने आज परीक्षेतील गुण म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता असा अर्थ घेतला जातो. अर्थात त्याला कारणेही तशीच आहेत. सर्व प्रवेशप्रक्रिया ही गुणांवर आधारित आहे. या पार्श्वभूमीवर ही गुणवत्ता खरेच यथायोग्य आहे का? हा प्रश्न चिंतनाचा आणि चिंतेचा बनला आहे, असे आपणास वाटत नाही का?

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक विकासाचे मूल्यमापन परीक्षेमधून होते का? की, फक्त ज्ञानात्मक विकास म्हणजे गुणवत्ता? परीक्षा पद्धतीतून फक्त ज्ञानात्मक विकासाची चाचपणी होते. अर्थात, परीक्षेच्या काळात आठवलेल्या ज्ञानाची! याचाच अर्थ परीक्षा ही स्मरणावर अवलंबून असते, हे पण आपण जाणतो! भावात्मक, क्रियात्मक विकासाचे काय? क्रियात्मक उद्दिष्टांमध्ये परत आपण थोड्याफार प्रमाणात परीक्षाच घेतो, मात्र विकासाच्या दृष्टीने भावात्मक विकासाचे आपण कोणत्या तंत्राने मूल्यमापन करतो? हा खरा प्रश्न आहे.

'आंतरिक शक्तीचा विकास म्हणजे शिक्षण' अशी शिक्षणाची व्याख्या स्वामी विवेकानंदांनी केली आहे. आपण विद्यार्थ्यांच्या कोणत्या आंतरिक शक्तींना चालना देण्याचा प्रयत्न करतो? ईश्वराने मनुष्याला जन्म देताना त्याला कोणतीतरी शक्ती दिलेली असते म्हणून स्वामीजींनी या शक्तींच्या विकासालाच शिक्षण असे नाव दिले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आंतरिक शक्तीचा शोध घेऊन त्या शक्ती फुलविणे, त्यांना प्रेरणा देणे हेच आपले ध्येय असले पाहिजे आणि हे इप्सित साध्य होईपर्यंत कार्यरत राहिले पाहिजे. स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत म्हणायचे झाले तर, 'उत्तिष्ठत्, जागृत्, प्राप्यवरान्निबोधत्' अर्थात उठा, जागे व्हा, ध्येय सिद्ध होईपर्यंत थांबू नका.

उद्याचा सुंदर दिवस या एका आशेवर उगवणार आहे हे निश्चित. ही आशा पल्लवीत होणार आहे. आपल्या मनोवृत्तीवर, एक दुर्दम्य आशावाद एक शिक्षक म्हणून माझ्यामध्ये जागृत असावा लागतो. हा आशावादच नवे काही करण्याची प्रेरणा उजागर करतो.

आपल्यापैकी बरेच जण अस्वस्थ आहेत आणि खरे तर नवे काहीतरी करण्याचा अस्वस्थपणा हेच खरे भांडवल आहे. मात्र आपण फक्त अस्वस्थ राहतो. हे कोणीतरी करावे, शासनाने.., प्रशासनाने.., संस्थेने.. अशा आपल्या अपेक्षा असतात. मी मात्र काही करणार नाही, मला भीती वाटते. मला कोणी काहीतरी बोलेल का? अधिक काम केले तर आणखी कामाचा बोजा माझ्यावर पडेल का? आणि कोणी काही काम हाती घेतले तर सहकारी आहेतच की, बघा! लागला पुरस्काराच्या मागे. या आणि अशा अनेक घटना फक्त अस्वस्थपणा वाढवितात, समाधान काही देत नाहीत; म्हणून ज्या काही विधायक गोष्टी कराव्याशा वाटतात त्या पटकन करून टाकणे यात आनंद असतो. विधायक कार्य करण्याची ऊर्मी आपणास अधिक चांगले काम करण्याची ऊर्जा देते असा अनुभव आपणा सर्वांना आहे. ही ऊर्जा आपणास आपल्या क्षेत्रात नवोपक्रम हाती घेण्याची संधी देते.



शिक्षकांचे अंतिम समाधान कोणते? विद्यार्थ्यांच्या आंतरिक शक्तीचा विकास करणे हेच होय. हे अनुभवाने आपल्या लक्षात येईल. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा वेध घेण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. त्यासाठी नवनवे उपक्रम सातत्याने हाती घेणे गरजेचे आहे. एका उपक्रमानंतर दुसरा अशी साखळी चालविण्याची क्षमता आपल्यामध्ये आहे. शेवटी धडपडणारा, उपक्रमशील शिक्षक विद्यार्थ्यांच्या दीर्घ काळ लक्षात राहतो हेही तितकेच सत्य आहे. नवनवीन जबाबदाऱ्या स्वीकारणे, त्या जबाबदाऱ्यांना फक्त न्याय देणे नव्हे, तर त्या जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी योगदान देणे हे समाधानी जीवनाचे लक्षण आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी आपल्यासाठी नवोपक्रम निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्याची एक नितांत सुंदर परंपरा निर्माण केली आहे. अगदी पहिलीपासून बारावीपर्यंतच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना ही स्पर्धा खुली आहे. निबंध लेखनाची एक सुटसुटीत पद्धतीही विकसित केली आहे. याची माहिती आपल्या जिल्ह्यात आपल्याला व्हावी यासाठी जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेला (डायट) अवश्य भेट द्या. तेथील प्राचार्य आपणांस नक्की माहिती देतील, आपल्यातील ऊर्मी जागृत करतील आणि आपण लेखनास प्रवृत्त व्हावे, असा विश्वासही देतील.

परिषदेप्रमाणे रिजनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, भोपाळ तर्फे अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचप्रमाणे काही अन्य संस्थाही अशा स्पर्धांचे आयोजन करीत असतात. विविध शैक्षणिक मासिकांतून याची निवेदने येतात. आपण त्यात सहभागी झाल्याने आपले विद्यार्थिपण सिद्ध करण्याची संधी यातून आपल्याला प्राप्त होते.

स्पर्धेचे लेखन हे फक्त आपले योगदान ठरविण्याची आणि सतत काही नवे करण्याची वृत्ती विकसित करण्याची दिशा आहे. माझे काम कोणी बघणार आहे, की नाही हे महत्त्वाचे नाही. माझे काम मी पाहतो आहे, ते दिवसेंदिवस अधिक प्रगल्भ होत आहे, ही आशा, हे समाधान आपणा सर्वांना आनंद देणारे असेल हे निश्चित.

**(पृष्ठ क्र. २५ वर)**

# कच्छ : भारतातील उपेक्षित भूभाग

**डॉ. लतिका भानुशाली**
मुंबई
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८

*सणसमारंभात स्त्रिया हौसेने केशभूषा करतात. मणी, फुले, माळा, चांद्या वगैरे माळून केस सजवतात आणि नंतर ते सगळे घुंघटमध्ये बंद करून घराबाहेर पडतात! येथील संस्कृती पुरुषप्रधान. कच्छी माणूस मुळातच उद्यमशील आहे. व्यवसाय त्याच्या रक्तात मुरलेला असतो.*

*'कच्छ' च्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीची ओळख या लेखात करून दिली आहे.*

१९९१ साली जानेवारी महिन्यातील पहिल्या आठवड्यात मी 'कच्छ'मध्ये पहिले पाऊल ठेवले, तेव्हा हा प्रांत आपल्या भावविश्वाचा एक भाग होईल असे मला वाटले नव्हते.

मी 'छेडाछेडी'साठी मुंबईहून कच्छला चालले होते. लग्न कुठेही केले तरी लग्नात बांधलेली साडी-धोतराची गाठ सोडायला नव-दांपत्याला नवऱ्यामुलाच्या मूळ गावी जावेच लागते. त्याला 'छेडाछेडी' म्हणतात. सोबत सासू-सासरे, आजेसासू, मोठीभाभी असा लवाजमा होता.

माझ्या आजेसासूबाई गाडीत माझ्याच बाजूला बसल्या होत्या ! कच्छी आजीबाई बऱ्याच वेळा पांढरी साडी परिधान करतात. खुद्द कच्छमध्ये असतील, तर लाल रंगाची विशिष्ट साडी, ज्याला 'पुतारो' म्हणतात, ती नेसतात. माझ्या आजेसासू देखण्या होत्या. वय ऐंशीच्या आसपास, उंच, सुरकुत्या पडलेली गोरीपान-नितळ कांती, तेजस्वी चेहरा, धारदार नाक, सुपारीएवढा पांढराशुभ्र अंबाडा, बोटात सोन्याची अंगठी, बांगड्या आणि गळ्यात रुद्राक्ष सोन्यात गुंफून केलेली माळ.

बरीच वर्षे मुंबईत वास्तव्य केल्याने मोडक्यातोडक्या हिंदीत त्या माझ्याशी संवाद साधू शकत होत्या.

'आजकाल माझे पाय खूप दुखतात,' असे म्हणून त्यांनी डोक्यावरचा पदर तोंडावर ओढून घेतला. सासुबाईंनी सोयीस्करपणे तिकडे दुर्लक्ष केले.

मी मात्र नवऱ्याच्या इशाऱ्यावरून त्यांचे पाय चेपायला सुरुवात केली. त्या दिवसापासून मी त्यांची खास मैत्रीण झाले !

वयाच्या नवव्या वर्षी त्यांचे लग्न झाले होते. कुटुंबातील बरीच मंडळी प्लेगमध्ये दगावलेली. खायचे हाल असतानाही या आपला एकुलता एक मुलगा व दोन मुलींसह संसाराचा गाडा ओढत राहिल्या. पुढे माझे सासरे कामधंद्यानिमित्त मुंबईत स्थायिक झाले. त्यादेखील मुलाबरोबर इथे आल्या; पण मनाने मात्र सदैव त्या कच्छमध्येच असायच्या.

मी पहिल्यांदाच कच्छला चालले होते. खुरटी झुडुपे, मधेच एखादा ओसाड-वाळवंटी प्रदेश, कधी राईच्या फुलांच्या शेतांचा पिवळा पट्टा, बाभळीची काटेरी झाडे, त्यांची पालवी ओरबाडून खाणारे उंट आणि पिवळीधमक भुरभुरीत माती नजरेस पडत होती. मधूनमधून रूक्ष वातावरणात नजरेला एकदम सुख देणारा एखादा विस्तीर्ण पसरलेला वड दिसायचा; जणू

भक्तांच्या गर्दीत ध्यानस्थ बसलेला एखादा महात्मा. मधेच घुंघट चेहऱ्यावर ओढून रस्त्यावरून चाललेल्या स्त्रिया, मोठमोठाले पागोटे घालून चावडीचावडीवर चहा पीत बसलेले पुरुष दिसत होते. माझ्या चेहऱ्यावर ओढलेल्या घुंघटातून समोरचे जे दिसत होते, ते पाहण्याचा प्रयत्न मी करत होते. कानावर आदळणारी भाषा ही परग्रहावरून आलेल्या माणसांची भाषा वाटत होती.

भूजपासून ८० किलोमीटरवर असलेल्या 'तेरा' या गावात आमची मोटार शिरली आणि 'मराठी' सून पाहण्यासाठी घराघरातून, भिंतींनी बांधून काढलेल्या बंदिस्त अंगणांतून लोक बाहेर आले. धरणीमाता पोटात घेईल तर बरे अशी माझी अवस्था झाली असताना, दोन म्हाताऱ्या स्त्रिया माझ्या दिशेने आल्या. घुंघट वर करून माझा चेहरा त्यांनी पाहिला आणि हातवारे करत काहीतरी प्रश्न विचारले. मला काहीच कळेना. त्या जे म्हणाल्या त्याचे भाषांतर मोठ्या भाभीने सांगितले आणि माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकले. त्या म्हणत होत्या, 'बाई गं, आमची भाषा जर तू शिकली नाहीस, तर इथला समाज तुला कधीच आपली म्हणणार नाही.'



ही परकी भाषा, या पाठी उघड्या टाकलेल्या, पण डोक्यावर मात्र पदर ओढलेल्या, गावंढळ दिसणाऱ्या बायका आणि हे पागोटेधारी पुरुष, ज्यांना संस्कृतीचा एक भाग म्हणून आपले केसही दिसलेले चालणार नाहीत; कसे जमेल मला?

दहा दिवस मला गावी राहायचे होते. इथे परका माणूस तुम्हांला चटकन दिसणार नाही; कारण घराचे अंगण उंच भिंतींनी बांधून काढलेले असते. त्यांना दरवाजे असतात व एक छोटी खिडकी असते.

अंगणातल्या कडुनिंबाच्या झाडावर राहणारे मोर-लांडोर सकाळी सकाळी अंगणात बागडत असायचे. मोरांची पिसे तर घर, अंगण, रस्ते, वाडी, चावड्या सगळीकडे पसरलेली असतात. पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने पाण्याचा वापर शक्यतो कमी करायचा. संध्याकाळी अंगणात मोठमोठ्याने भजन म्हणत बसणे, हा सर्व घरात चालणारा सामूहिक प्रकार. त्या वेळी केबल हा प्रकार तिथे पोहोचला नव्हता.

''तू मांस-मच्छी खातेस का?'' माझ्या सासूचा प्रश्न. माझ्या 'नाही' या उत्तरावर तिने विश्वास दाखवला व मला स्वयंपाकघरात काम करण्याची परवानगी मिळाली. सासूबाईंचा करारी चेहरा पाहून माझ्या मनात धडकी भरत असे. उंच व जाड, रुक्ष चेहरा, लांब-धारदार नाक असे भारदस्त व्यक्तिमत्त्व. न थकता अखंड बडबड. आपल्या मुलांवर, सुनांवर, घरावर, नवऱ्यावर वर्चस्व राहावे, यासाठी सतत सगळी धडपड. मनाने मात्र एकदम हळवी आणि प्रेमळ.

''मी तुला सून म्हणून स्वीकारले. आता कोणी काही बोलले तरी लक्ष देऊ नकोस.''

''हं'' माझी संमती.

''उद्या कपडे धुवायला गावात तळ्यावर जाशील, तेव्हा सर्व जण तुझे आडनाव विचारतील, पण काही बोलू नकोस.''


''हं'' माझा पुन्हा हुंकार.

मग पुढील प्रत्येक कच्छभेटीत तिने मला सावरून घेणे व बदल्यात तिला खूश करणारे वर्तन करत राहणे, हा माझ्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनत गेला.

गेल्या सतरा वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आणि परका वाटणारा कच्छी समाज माझा कधी झाला ते मला कळले नाही.

गुजरात राज्याचा भाग असलेल्या कच्छचे क्षेत्रफळ आहे ४५,६१२ चौरस किलोमीटर. गुजरातमधील सर्वाधिक मोठा जिल्हा, तर भारतातील 'लेह' नंतरचा सर्वांत मोठा जिल्हा.

'कच्छ' या शब्दाचा अर्थ आहे मधूनच कोरडा, तर मधूनच ओला होणारा. या अर्थाचा संबंध थेट कच्छच्या रणाशी आहे. पावसाळ्यात थोडा ओलसर होणारा आणि एरवी रणरणत्या उन्हाने कोरडा असणारा कच्छच्या रणाचा प्रदेश. एकीकडे कच्छचे आखात, तर पश्चिमेला व दक्षिणेला अरबी समुद्र.



जिल्ह्याची लोकसंख्या दीड लाखांच्या आसपास. भूज, अंजार, मांडवी, मुंद्रा, राजापूर, आदिपूर इत्यादी महत्त्वाची शहरे. कच्छच्या रणाची दुसरी बाजू म्हणजे भारत–पाकिस्तान सीमारेषा.

इथे प्रामुख्याने वापरल्या जाणाऱ्या भाषा आहेत. गुजराती व कच्छी. खरे तर, कच्छी संस्कृती ही राजस्थानशी अधिक मिळतीजुळती आहे, पण भौगोलिकदृष्ट्या हा भाग गुजरात राज्यात येतो. कच्छी भाषा ही गुजराती भाषेपेक्षा सिंधी भाषेशी अधिक जवळीक साधते. या भाषेत 'र', 'ठ', 'ड' अशा कठीण व्यंजनांचा अधिक वापर होतो, त्यामुळे ही भाषा कानाला फारशी गोड वाटत नाही. उलट कच्छी भाषा माहीत नसणाऱ्या माणसाला मोठमोठ्याने कच्छीत बोलणारी माणसे पाहिल्यावर ती एकमेकांशी भांडत आहेत, असे वाटण्याची शक्यता जास्त; परंतु या भाषेला स्वतःचा एक लहेजा आहे. देशीपणाचा अस्सल गंध आहे. आज ही भाषा गुजरातीप्रमाणे लिहिली जाते.

अखंडपणे, न थकता अव्याहत बडबड करणे हे कच्छी माणसाचे व्यवच्छेदक लक्षण. लग्न, साखरपुडा वगैरे समारंभात तर हॉलच्या एका कोपऱ्यातील माणसे दुसऱ्या कोपऱ्यातील माणसांना साद घालत संवाद साधण्याचा प्रयत्न करत असतात. इच्छित माणसापर्यंत पोहोचेपर्यंतसुद्धा त्यांना धीर धरवत नाही, त्यामुळे त्यांच्या समारंभात शिस्तीपेक्षा गोंधळच अधिक असतो.

''किं ह यो?'' (कशी आहेस?)

''लहेर लगी पयी ये'' (आनंदाच्या लहरी जीवनात आहेत). अशा प्राथमिक संवादाने बोलणे सुरू होते. पुरुषांच्या गप्पांत धंदा, हवापाणी तर बायकांच्या गप्पांत पाहुणे, सासू, जेवण, कोणाचा मुलगा/मुलगी लग्नाचा/ची आहे, कोणाचे लग्न ठरले असे विषय. सामाजिक, जागतिक घडामोडींना त्यात विशेष स्थान नाही. हा समाज बराचसा त्यांच्यात्यांच्यातच असतो. शक्यतो आपला समूह सोडून इतरांच्या सणसमारंभांत भाग घेत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे

बायकांना अजिबात स्वातंत्र्य नाही. सुनांवर सासूचे पूर्ण वर्चस्व असते. संयुक्त कुटुंबव्यवस्था आदर्श मानली जाते. तरुण वयात जोडप्यांनी स्वतंत्र राहणे हे घरादाराला लांछनास्पद समजले जाते. घरात मोठ्या दिरांपुढे, सासऱ्यांपुढे स्त्रियांनी घुंघट ओढलाच पाहिजे. सणसमारंभात स्त्रिया हौसेने केशभूषा करतात. मणी, फुले, माळा, चांद्या वगैरे माळून केस सजवतात आणि नंतर ते सगळे घुंघटात बंद करून घराबाहेर पडतात! सासऱ्यांसमोर खुर्चीवर बसायचे नाही हा अलिखित नियमच.

शहरातील मुली मात्र आता महाविद्यालयीन शिक्षण घेताना दिसतात. मात्र शिक्षण घेऊन करिअर करणे, नोकरी करणे याचा विचार फक्त १ टक्का मुलीच करतात. बाकी मुली बहुधा घर आणि नवरा चांगला मिळावा म्हणून महाविद्यालयाची पायरी चढतात. विशीच्या आत बऱ्याच जणींची लग्ने झालेली असतात. ग्रामीण भागात तर हे वय पंधरा-सोळा असते. त्या मुलीसुद्धा संसार, मुले यांतच खूश असतात. स्त्रियांचे जीवन तसे फारसे मोकळे नाहीच. इतर स्वातंत्र्य नसल्याने विवाह, साखरपुडा, छट्टी (बारसे), तर कधी सदरी (शोकसभा) या निमित्तांनी घराबाहेर पडण्याची संधी मिळते.

मी पोस्ट ग्रॅज्युएशन करणार म्हटल्यावर पहिल्यांदाच माझ्या सासूच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

''आधीच तू पंधरा बुकं शिकली आहेस, आता आणखी शिकून काय करणार? आपल्याकडे कोणी नोकरी करत नाही. लहान मुलाकडे दुर्लक्ष होईल. माझ्याही मुलाचे तू हाल करशील. बाई जास्त शिकलेली बरी नाही.'' असा विरोध दाखवण्याचा तिने आटोकाट प्रयत्न केला, पण तिच्या मुलाला मी आधीच पटवून ठेवले होते! तिचा नाइलाज झाला.

आपल्या मुलींनी शिकावे असे आताच्या पिढीतील पालकांना वाटते, पण जीन्स-टी शर्ट घालणाऱ्या शहरी मुलींची मानसिकता जिथे बदलायला तयार नाही, तिथे ग्रामीण भागातील मुलींच्या स्थितीचे वर्णन काय करावे? अपवादात्मक उदाहरणे मात्र आहेत.

मुलांची कथा त्यापेक्षा वेगळी असते. कच्छी माणूस मुळातच उद्यमशील आहे. व्यवसाय त्याच्या रक्तात मुरलेला असतो. त्यामुळे लहानपणापासून मुलांची जडणघडण स्वाभाविक त्याच दिशेने होते. मग पैसा मिळवण्याच्या साधनांशी आधीच ओळख झाल्याने शिक्षणात या मुलांना रस उरत नाही. नववी-दहावीला असतानाच ही मुले वडिलांबरोबर धंद्यात उतरतात. मग पुढचे शिक्षण जेमतेमच होते.

कच्छी लोकांच्या उद्यमशील व कष्टाळू वृत्तीमुळे शहरात येऊन त्यांनी बराच पैसा गाठीशी गोळा केला आहे. दोन-दोन, तीन-तीन वर्षे पाऊस पडत नसतानासुद्धा येथील शेतकरी आत्महत्या करत नाही. इतर व्यवसायांकडे वळतो. कच्छमध्ये उद्योगधंदे वाढतच आहेत. विशेषतः जानेवारी २००१ च्या भूकंपानंतर तर कच्छ फिनिक्स पक्ष्यासारखा उठून उभा राहिला. कांडला, मुंद्रा या दोन बंदरांमुळे आखाती देशांशी व्यापार शक्य झाला आहे. छोट्या तीन चाकी, चार चाकी ट्रकचे जाळे कच्छभर पसरले आहे. 'रत्नाल' हे शहर आशिया खंडातील सर्वांत जास्त ट्रकची मालकी असणारे शहर आहे. भिलाडी गावातील बँकांमध्ये दोन बिलियन डॉलरपेक्षा जास्त डिपॉझिट आहे! या गावाची गणना भारतातील श्रीमंत गावांत होते. संपूर्ण भारताला ७० टक्के मिठाचा पुरवठा इथूनच होतो. या लोकांचे शहरातील व्यवसाय म्हणजे रेशनिंगचे दुकान, कापडबाजार, प्लॅस्टिक किंवा लोखंडाचे ड्रम रिसायकलिंगचा उद्योग. आताची नवी पिढी इस्टेट

एजंट, क्रिकेट बेटिंग, शेअर मार्केट इत्यादींकडे वळत आहे. बारदानाच्या (धान्याची गोण) धंद्यात या लोकांचे वर्चस्व आहे.

कच्छमधील बऱ्याच जाती–जमाती–प्रजाती हजारो वर्षांपूर्वी मारवाड, सिंध, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण, रशिया, मध्य आशिया इथून आलेल्या आहेत. प्रागैतिहासिक काळाच्या इथे आढळणाऱ्या खुणा म्हणजे इंडस व्हॅली सिव्हिलायझेशनशी नाते सांगणारे 'ढोलवीरा' हे गाव.

भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत 'जाडेजा' घराण्याने कच्छ व मारवाड येथे राज्य केले. या भागांशी नाते सांगणारे पुरावे या प्रांतातील 'भानुशाली' व 'लोहाणा' या जमातीत पाहायला मिळतात. रणरणत्या उन्हात शेतात काम करणाऱ्या बायका अत्यंत देखण्या असतात. त्यांची गोरीपान, नितळ कांती आनुवंशिकतेचे देणे असणार यात शंका नाही. हजारांत एखादी स्त्री कुरूप म्हणता येईल, इतके सौंदर्याचे प्रमाण या दोन्ही जमातींत आहे. लांब, धारदार नाकाची देणगी यांना जन्मजात लाभली आहे. जैन कच्छी वाघडिया समाजाला मात्र हे वरदान लाभलेले नाही. या सुंदर, गोऱ्यापान मुलींना सोडून माझ्या पतीने एका काळ्यासावळ्या, मराठी मुलीशी लग्न का केले हा प्रश्न आजही समस्त भानुशाली समाजाला पडलेला आहे.

अनेक भटक्या जमातींचे अस्तित्व इथे पाहायला मिळते. कच्छी रबारी (कोपरापर्यंत पांढऱ्या बांगड्या व शे–सव्वाशे चुण्यांचा लयदार घागरा घालणारी जमात), लेवा पटेल, मेघवाल वगैरे. यांपैकी लेवा पटेल हा समाज तर अत्यंत श्रीमंत आहे. त्यांच्यापैकी अनेक जण व्यवसायानिमित्त लंडन व इतर युरोपीय देशांत स्थिरावले आहेत. या एनआरआय लोकांचा पैसा पटेलांच्या गावांना समृद्धी देत आहे. कच्छमध्ये पटेलांनी सुंदर बंगले बांधले आहेत.

कच्छी समाज हा प्रामुख्याने शाकाहारी आहे. राई, सूर्यफूल, शेंगदाणे, जिरे, एरंडेल, बाजरी ही पिके इथे प्रामुख्याने घेतली जातात. जमीन अतिशय सुपीक, त्यामुळे थोड्या पावसातही चांगली शेती होते. बाजरीची भाकरी, कढी आणि हिरव्या सालाच्या मूगडाळीची खिचडी हे संध्याकाळचे जेवण. फक्त घराघरात भाजीच्या उपलब्धतेनुसार कढीचे प्रकार बदलतात. वर्षभर भाज्या उपलब्ध नसल्याने त्या सुकवून वर्षभर वापरल्या जातात. शहरात मात्र हे चित्र आता बदलत आहे. एरवी रूढी–परंपरांच्या बाबतीत कट्टर असणाऱ्या या समाजाने इथे मात्र बदल स्वीकारला आहे. खुद्द कच्छमध्ये मात्र संध्याकाळी सालवाल्या हिरव्या मूगडाळीची पातळ, थबथबीत खिचडी पाहिजेच. मातीच्या हंड्यात तांदूळ व डाळ यांच्या चौपट पाणी आणि मीठ घालून, दोन–दोन तास ही खिचडी चुलीवर शिजत रहाते. मातीच्या या हंड्याला 'कोना' म्हणतात. कोन्यातील थबथबीत, गरमागरम खिचडी, त्यावर तुपाची धार, कढी आणि खापरीत थापलेली बाजरीची भाकरी ! भरल्यापोटीसुद्धा तोंडाला पाणी न सुटले तर नवलच ! खिचडी उरली तर ती दुसऱ्या दिवशी ताकात घालून नाश्त्याला प्यायची. भाकरी, चपाती उरली तर त्यावर ताक ओतून फोडणी घालायची व खायचे. दही, ताक हे इथल्या जेवणातील अविभाज्य घटक आहेत. जेवणात भाजी नसली तरी चालेल, पण ताक पाहिजेच ! घराघरांत ताकाचे चक्क हंडे किंवा कळश्या भरलेल्या असतात. घरी आलेल्या पाहुण्यांना ताक किंवा दूध देणे हे सौहार्दाचे लक्षण समजले जाते. विवाह नक्की केला, की मुलाकडचे व मुलीकडचे लोक एकत्र येऊन

दूध पिण्याचा सामूहिक कार्यक्रम करतात. माझ्या घरी ताकाचे असे भलेमोठे हंडे बघून माझ्या बहिणी माझ्या घराला चक्क 'गोकुळ' म्हणतात.

कच्छी लोक स्वतःचा उल्लेख क्षत्रिय म्हणून करतात. त्यामुळे लग्नसमारंभात तलवार ही लागतेच. आपल्या समाजासाठी आपल्या कुवतीनुसार दान करणे ही इथली प्रवृत्ती आहे. वेगवेगळ्या समाजाच्या वेगवेगळ्या सामाजिक संस्था आहेत. जैन सामाजिक संस्थांकडे येणारा पैसा हा 'देरासर' बांधण्यासारख्या धार्मिक कामासाठीच प्रामुख्याने वापरला जातो. भानुशाली समाजात आता आता हा पैसा मंदिरांकडून विधायक कार्याकडे वळू लागला आहे. भानुशाली समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी आठ वसतिगृहे बांधली आहेत. ठिकठिकाणच्या शहरांत भानुशाली वाड्या, महाजन वाड्या स्थापन केल्या आहेत. त्यामुळे समारंभासाठी या समाजाला स्वतःचे हॉल अत्यल्प दरात उपलब्ध असतात. गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे शिक्षणाची आवड असणाऱ्या कच्छी विद्यार्थ्याला पैशाअभावी अडून राहावे लागत नाही. इतर जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांना मात्र याचा लाभ घेता येत नाही.

कच्छी समाजाचे धार्मिक जीवन अत्यंत समृद्ध आहे. जैन, हिंदू, शिया मुस्लिम, क्वचित शीख धर्म इथे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. श्रद्धा-अंधश्रद्धांनी या समाजाला वेढून टाकले आहे. गावागावाच्या बाहेर कोणे एकेकाळी सती गेलेल्या बायकांची मंदिरे आहेत. ही मंदिरे त्या त्या गावाच्या श्रद्धेचा भाग आहेत. शीतलादेवीचा सण मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. दोन-तीन महिन्यांतून एकदा हा सण येतोच. त्यातला एक भाग म्हणजे आदल्या दिवशी रात्री चुलीची पूजा करायची आणि दुसऱ्या दिवशी चूल न पेटवता, आदल्या दिवशीचे फक्त शिळेच अन्न खायचे.

महाराष्ट्रातील भाऊबिजेसारखा 'वीर-फसली' नावाचा सण भानुशाली समाजात साजरा केला जातो. यामागची आख्यायिका अशी, की जंगल पार करून बहिणीला भेटायला येणाऱ्या भावावर वाटेत दुथडी भरून वाहणारी नदी, साप, वाघ, सिंह यांसारखी जनावरे अशी संकटे येतात, पण भावाची वाट पाहात बहीण घरी पूजा करत असते आणि तिच्या पूजेतील सामर्थ्यामुळे भावावरील संकटे दूर होतात. त्या कहाणीची आठवण म्हणून हे व्रत बहिणीने भावासाठी करायचे असते. त्या भावावर आलेल्या संकटाचे प्रतीक म्हणून गव्हाच्या पिठाचे चौकोनी गोळे बनवले जातात. त्याबरोबर सुके खोबरे व दुर्वा ठेवल्या जातात. त्याला कुंकू वाहिले जाते. नंतर हे सर्व खलबत्त्यात घालून स्वयंपाकघराच्या उंबरठ्यावर कुटायचे. नऊ वेळा कुटायचे व प्रत्येक वेळी उठून बत्ता किंवा लोखंडी सोटा दरवाज्याच्या वरच्या भागाला टेकवायचा. नऊ वेळा असे करताना कंबरेचे पार धिरडे होऊन जाते. त्यानंतर बहिणीने जेवून मगच स्वयंपाकघराच्या बाहेर पाऊल टाकायचे. मला सख्खा भाऊ नसल्याने मी कोणासाठी हे व्रत करणार असा मोठा प्रश्न माझ्या सासूला पडला होता. शेवटी, नणंदेच्या नवऱ्याला माझ्या भावाचा मान मिळाला.

'नवरात्र' हा कच्छच्या सांस्कृतिक जीवनाचा आत्मा आहे. चनियाचोलीवरील कच्छी भरतकामाचे उत्कृष्ट नमुने पाहायचे, तर कच्छचे नवरात्र पाहायलाच हवे. कच्छी बांधणीची साडी आणि कच्छी भरतकामाचे सोळा प्रकार जगप्रसिद्ध आहेत. प्रत्येक गावाच्या स्वतःच्या महाजनवाड्या असतात. तिथे नवरात्र साजरे केले जाते. पूर्ण चेहरा झाकून जाईल असा घुंघट

डोक्यावर घेऊन, हातात थाळी व त्यात पेटते दिवे घेऊन बायका रात्रभर गरबा खेळत असतात. पुरुष वेगवेगळी सोंगे वठवून गरबा खेळतात. हल्ली शहरीकरणाच्या प्रभावामुळे स्त्री-पुरुष एकत्र गरबा खेळतात. या दिवसांत जेवणसुद्धा बऱ्याचदा महाजनवाडीतच शिजवले जाते. वाटले तर दानपेटीत पैसे टाका किंवा फुकट जेवा! म्हणून नवरात्रात मुंबईपेक्षा कच्छला जायला बायका जास्त उत्सुक असतात.

शहरात येऊन स्थिरावलेला कच्छी समाज आता बदलत आहे. विशेषतः मुली. शिक्षण व नोकरी यांमुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळू शकते, आपले अस्तित्व टिकवण्याची संधी मिळू शकते याची जाणीव त्यांच्यात निर्माण होऊ लागली आहे.

वाळवंट हळूहळू तापत आहे! गरम झालेली हवा आकाशाकडे झेपावते आहे. बहुतेक कच्छच्या रणात जोरात पाऊस पडणार!

❑❑❑

**(पृष्ठ क्र. ९ वरून)**

श्री. अजित तिजोरे व डॉ. माधव सूर्यवंशी या संपादक मंडळाने पहिल्यापासून घेतल्याचे जाणवते. या पुस्तकासाठी लेखन करणारे सर्व जण काही लेखक नाहीत किंवा शिक्षणक्षेत्राशी संबधित नाहीत. यांतील काही जण वकील आहेत, काही व्यावसायिक आहेत, तर काही बँकर्स आहेत. अशा लोकांनी लिहिलेले लेख हे शुद्ध मराठीचा आग्रह न धरता औपचारिक किंवा अनौपचारिक गप्पा मारताना आलेल्या संज्ञा, रुळलेले इंग्रजी शब्द तसेच ठेवण्यात आल्याने नव्या वाचक पिढीला हे समजून घेणे सोपे जाते आहे. यामुळे संवादातील जिवंतपणा टिकवून ठेवण्यात संपादक मंडळ यशस्वी झाले आहे. या पुस्तकात अद्ययावत माहिती, स्थानाची माहिती व्हावी यासाठी संबंधित देशांचे नकाशे व मूळ व्याख्यान वाचकांना सहज उपलब्ध व्हावे यासाठी क्यूआर कोड देण्यात आले आहेत, म्हणजेच 'देशोदेशीचे शालेय शिक्षण' हे पुस्तक केवळ वाचनीयच नाही, तर वाचकांशी संवादही साधते.

❑❑❑

## शब्दमंथन

**माधव राजगुरू**
भ्रमणध्वनी : ९४२३५६९०८४

- **अंडीपिल्ली :** पक्ष्यांचे अंडे हा शब्द परिचित आहे. अंड्यांमध्ये पिले असतात, ती दिसत नाहीत. ती बाहेर काढणे म्हणजे जे दिसत नव्हते, ते प्रकट करणे. यावरून 'अंडीपिल्ली बाहेर काढणे' असा शब्दप्रयोग रूढ झाला. याचा अर्थ असा – एखाद्याच्या संदर्भातील त्याच्या सूक्ष्म, माहीत नसलेल्या गुप्त गोष्टी बाहेर काढणे.
- **अंत:करण :** अंतः आणि करण या दोन शब्दांचा मिळून हा शब्द तयार झाला आहे. अंतः म्हणजे आतले. इथे पुढे जोडलेला 'करण' शब्द प्रत्यय नाही. करण शब्दाचे इतर अनेक अर्थ असले, तरी इथे त्याचा अर्थ 'इंद्रिय' असा आहे. अतःकरण म्हणजे आतले इंद्रिय, मन, बुद्धी, चित्त व अहंकार यांच्या समूहाला अतःकरण म्हणतात.
- **अत:पूर :** अंतः म्हणजे आतले, 'पूर' म्हणजे 'निवासस्थान.' या दोन्ही शब्दांचा मिळून 'अतःपूर' शब्द तयार झाला आहे. प्राचीन काळी घरातल्या स्त्रीने परक्या पुरुषांपुढे न जाण्याची पद्धत होती. परपुरुषांच्या नजरेस पडू नये; म्हणून स्त्रियांसाठी आत वेगळे निवासस्थान असायचे. बायकांच्या या निवासस्थानाला 'अंतःपूर', 'गोषा', जनानखाना (फारसी) असे शब्द योजले जायचे.

**(पृष्ठ क्र. २५ वर)**

# ‘भ’ भाषेचा!

**चारुता प्रभुदेसाई**
पर्यवेक्षक, अहिल्यादेवी हायस्कूल, पुणे.
भ्रमणध्वनी : ९९२२७५१८१९

भाषा हे संवादाचे एक साधन आहे. तसेही भाषेशिवाय पशू, पक्षी त्यांच्या भावना व्यक्त करतात, पण तीसुद्‌धा मुकी भाषाच असते. नजरेची भाषा, स्पर्शाची भाषा, प्रेमाची भाषा आणि संवादाची भाषा. आजकाल तुम्ही–आम्ही स्मायलीचा वापर करून आपल्या भावना दुसऱ्यापर्यंत पोहोचवतो. मग तीही एक प्रकारची भाषाच. राग, प्रेम, दुःख, आनंद, निराशा अशा भावना व्यक्त करायला भाषेचे प्रभावी माध्यम लागते. चित्रातूनही आपण आपले विचार व्यक्त करू शकतो. ती असते रंग–रेषांची भाषा! पण संवाद साधण्यासाठी भाषा जास्त महत्त्वाची ठरते.

लहानपणापासून जर एखाद्या मुलाच्या कानावर भाषा पडलीच नाही, तर त्याला बोलता येणार नाही. टारझन, मोगली यांसारख्या गोष्टीत आपण हे बघितले. अनेक वेळा आपण लहान मुलांना त्या त्या वस्तूची ओळख करून देताना वेगळेच शब्द वापरतो. उदा., पाणी दाखवण्यासाठी पा किंवा कुत्रा सांगायला भू.. भू.., भीती दाखवायला बाऊ, भाताला मंमम, चमच्याला चंपा, मार देणेला हाट, कावळ्याला काऊ आणि असे अनेक शब्द ते मूल समांतर शिकत जाते. मोठा होईल तसे त्याला त्याचे मूळ शब्द कळत जातात. मला अनेकदा वाटते की मुलाला जर आपण वेगळेच शब्द शिकविले, तर ते मूल तसेच शिकेल ना!

म्हणजे समजा जर आपण चमचा या वस्तूचे नाव शिकवताना त्याला काठी म्हटले, तर ते मूल त्याला काठी म्हणेल. माझ्या मुलीच्या बाबतीत ती लहान असताना झालेली एक मजेशीर गंमत सांगते. ती नुकतीच बोलू लागली होती आणि घरात आमच्या बोलण्यातून मराठी तिच्या कानांवर पडू लागले होते.

> “ *मुले मोठ्यांचे ऐकून पाहून अनुकरण करत भाषा शिकत असतात. हे एक प्रकारचे अनौपचारिक भाषा शिक्षणच असते; म्हणून मुलांच्या कानांवर सतत चांगली भाषा पडली पाहिजे. गोष्टींच्या माध्यमातून, प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून भाषेतील शब्द, वाक्ये मुलांच्या मनावर बिंबवली पाहिजेत. हे अनौपचारिक भाषाशिक्षण पुढे औपचारिक शिक्षणास उपयोगी ठरते.* ”

तिला सर्दी व्हायची म्हणून आम्ही तिला दही खायला मनाई करायचो. जेवताना तिने दही मागू नये म्हणून आम्ही ते भांडे लपवायचो आणि तिला कळू नये म्हणून इंग्लिशमध्ये म्हणायचो, "Don't Show her."

तिच्या सतत ते कानावर पडून एक दिवस तिने आमची विकेटच घेतली. ते शब्द इंग्लिश असूनसुद्‌धा तिला तिच्या आवडीचे दही हवे होते तेव्हा तिने म्हटले, ‘‘आई मला 'Don't Show her' दे’’. 'Don't Show her' म्हणजे दही हे समीकरण तिने तिच्यापुरते लक्षात ठेवले. आम्हांला ते विनोदी वाटता वाटता डोळ्यांत अंजन घालणारे ठरले. मुलेच असे काही शिकवून जातात, की तिथे आपण चकित होतो!

भाषेचे संस्कार हे असेच घडत असतात. आपण घरात म्हणी, वाक्प्रचार, आलंकारिक शब्द वापरले तर

ते मुलांना माहीत होतात. मग मुले चपखलपणे ते शब्द वापरू शकतात. हल्ली अनेक शब्द मुलांना माहीत नसतात. काम करायला येणाऱ्या बाईने खाडा केला, शेजाऱ्यांची भानगड आहे, भाताचा चिखल झाला, मोबाईलचे वेड लागले, तो अगदी अकलेचा कांदा आहे, किंवा वा, वा, शहाणाच लागून गेलास! हे असले शब्द मुलांना खऱ्या अर्थाने समजत नाहीत.

काही वेळा अनेक शब्दांची व्युत्पत्ती आपल्या सहज लक्षात येते. उदा., 'मज्जाव' हा शब्द हिंदी मत जाव वरून आला असेल. दोघांचाही अर्थ सारखाच ....... मनाई, किंवा मातृ = मा, किंवा पितृ = पिता, भाऊ = भाई = भ्राता असेही साधर्म्य असलेले विविध भाषांमधील शब्द आपल्याला आश्चर्यचकित करतात. फक्त ते शोधण्याची सवय मुलांना आणि मोठ्यांनाही असली पाहिजे.

भाषेची आवड निर्माण होण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे पाठांतर. पूर्वी लोकांना अनेक कविता पाठ असायच्या. तालासुरावर त्या म्हटल्या जायच्या. विशिष्ट वृत्तानुसार विशिष्ट चाली असतात. त्या चालीतच त्या कविता म्हणता येतात. पूर्वी भजन, कीर्तन यातून या चाली ऐकता येत असत. असे कानांवर पडले, तर ते गुणगुणले जाते, हीसुद्धा सवय मुलांना असली पाहिजे. उदा., शार्दुलविक्रिडीत वृत्त म्हटले, की मंगलाष्टक त्या चालीत म्हटले जाते. भुजंगप्रयात वृत्तात मनाचे श्लोक म्हणतात, हे माहीत असणे गरजेचे आणि आनंदाचे आहे! आज वर्गावर्गातून अशा कविता म्हणण्याचे हे प्रमाण खूप कमी दिसते.

पाठ्यपुस्तकात काय आहे, काय नाही याची चर्चा करण्यापेक्षा भाषा म्हणून आपल्याला आपला व्यासंग वाढवता आला पाहिजे. मुलांना, शिक्षकांना, पालकांना आणि सर्वांनाच!




शब्दकोडी सोडवणे हा अजून एक भाषा समृद्धीचा उत्तम मार्ग आहे; मग ती कोणत्याही भाषेतील असोत म्हणी वापरणे, शब्द मनोरे रचणे असे काही शाब्दिक गमतीजमतीचे प्रकार किंवा मराठीतून दुसऱ्या भाषेत किंवा दुसऱ्या भाषेतून मराठीत भाषांतर, प्रतिशब्द असे प्रकारसुद्धा भाषेची गोडी लावतात.

भाषा ही फक्त पुस्तकातूनच शिकता येत नाही, तर त्यासाठी त्या भाषेच्या वातावरणात राहावे लागते. भाषा ही ऐकून जास्त येते. उदा., मुंबईला हिंदी जास्त वापरली जाते; कारण तिथे हिंदी शब्द जास्त कानांवर पडतात. अपभ्रंश होऊन अनेक शब्द भाषेत मिसळून जातात किंवा एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनेक शब्द घेतले जातात. काही शब्द काळानुरूप गडप होतात.

आपल्या आवडत्या भाषेतील गाणी ऐकणे, चित्रपट पाहणे, लेखन करणे, कविता करणे, मासिके, वर्तमानपत्रे वाचणे, पुस्तके वाचणे, शब्दकोश पाहणे, व्युत्पत्ती कोश, संस्कृती कोष अभ्यासणे यानेसुद्धा भाषेची अभिरुची वाढते. आपल्या भाषेतील मोठे लेखक, कवी, संगीतकार यांची माहिती असणेसुद्धा गरजेचे आहे. सहज जाता–येता दुकानांवरील पाट्या पाहणे, त्यातील चूक शोधणे हासुद्धा एक आवडीचा छंद होऊ शकतो. वाहनांवर मागे लिहिलेले वाचणे मनोरंजक असते. उदा., तेरा मेरा ७, थांब लक्ष्मी कुंकू लावते, बुरी नजर वाले तेरा मुँह काला, कशाला बघतोस रागाने, मागे टाकले वाघाने! वगैरे वगैरे...

अशी भाषा आपल्याला पावला–पावलावंर भेटत

असते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत ओव्या, गाणी, गोष्टी, संवाद यातून भाषेचे हर प्रकारचे रूप आपण बघतो, बोलतो, ऐकतो!

फक्त मराठीच नाही, तर हिंदी, संस्कृत, इंग्लिश आणि अन्य प्रादेशिक भाषासुद्धा आपल्याला अशा सहज सुंदरपणे शिकता येतात. एखादी परकी भाषा शिकणे हा हल्ली करिअरचा उत्तम मार्ग झाला आहे. अनुवाद करणे, तसेच नोकरीच्या इतर संधी यात आहेत, त्यामुळे परदेशी प्रवास घडून भाषेचे, संस्कृतीचे आदानप्रदान होते. भाषा हे संस्कृती शिकण्यासाठीचे महत्त्वाचे साधन बनते.

*भाषा भेटते ओवीत, भाषा भेटते पोथीत*
*भाषा भेटते भजनी, भाषा भेटते कीर्तनी!*
*भाषा गुंजते गळ्यात, भाषा भेटते मळ्यात*
*भाषा भेटते डोंगरी, भाषा भेटते किनारी!*
*अशी भाषेची ही रूपे, हरतऱ्हेची स्वरूपे*
*भाषा संवाद साधन, भाषा मूर्त चिरंतन!*

❑❑❑

(पृष्ठ क्र. १५ वरून)

आपण सर्व जण एक दिवस सेवानिवृत्त होणार आहोत. सेवानिवृत्तीनंतर आपण केलेल्या विविध उपक्रमांच्या पाऊलखुणा आपणास नक्कीच सुखावतील हे निश्चित! शाळेतील एखादा माजी विद्यार्थी बऱ्याच वर्षांनी भेटला, तर तो आपल्या या आठवणी तुम्हांला नक्कीच सांगेल. कदाचित, वयपरत्वे आपण त्या विद्यार्थ्याला विसरले असतो, आपण केलेले उपक्रमही विसरले असतो; पण एक साधी आठवण आपणामध्ये पुन्हा नवचैतन्य निर्माण करते आणि म्हणून नवोपक्रमाचा नंदादीप तेवत ठेवा आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी...

*नवनिर्माणाच्या वृत्ती जागत्या ठेवूया ।*
*नवी ऊर्मी, नवी ऊर्जा नवोपक्रमास लाभूद्या ।*
*अस्वस्थतेकडून–स्वस्थतेकडे प्रवास करूया ।*
*शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी घडवूया ।*
*बलशाली चारित्र्यवान राष्ट्र बनवूया ।*
*नवोपक्रमाचा नंदादीप तेवता ठेवूया ।*

❑❑❑

(पृष्ठ क्र. २२ वरून)

- **अंधकार :** हा एकच शब्द आहे. यात विसर्ग नाही. चुकूनही हा शब्द अंध:कार असा लिहू नये. खूप खूप अंधार असला, तरी अंधकार असेच लिहावे.
- **अंबरीष :** या शब्दात 'श' चा 'ष' कार झाला आहे. अंबर म्हणजे आकाश. ईश म्हणजे स्वामी, मालक. आकाशाचा (अंबराचा) स्वामी तो अंबरीष. पूर्वी अंबरीष नावाचा राजा होऊन गेला. या शब्दाचे सूर्य, विष्णू, शिव असे अनेक अर्थ आहेत.
- **कटिबद्‌ध :** कटी म्हणजे कंबर, बद्‌ध म्हणजे बांधलेले. कंबर बांधलेला असा शब्दश: अर्थ आहे. मात्र एखादी कृती किंवा काम करण्यासाठी मी तयार आहे, सिद्‌ध आहे असे सांगण्यासाठी 'मी कटिबद्‌ध' आहे, असा शब्दप्रयोग केला जातो.
- **कंठस्नान :** कंठ आणि स्नान हे दोन शब्द एकत्र येऊन हा शब्द तयार झाला आहे. याचा शब्दश: अर्थ गळ्याला स्नान असा होतो. हे स्नान साध्या पाण्याचे नाही. हे फक्त रक्ताचे स्नान आहे. यावरून कंठस्नान घालणे म्हणजे गळा कापणे असा अर्थ रूढ झाला आहे.
- **कदन्न :** कद् म्हणजे वाईट. हा शब्द अन्न शब्दाला जोडून आल्यामुळे त्याचा अर्थ वाईट, जाडेभरडे अन्न असा होतो. दानासाठी वाईट अन्न.
- **करज :** याचा अर्थ बोटाचे नख. 'कर म्हणजे हात. 'ज' म्हणजे जन्मणारे, जन्मलेले. हाताच्या बोटातून जन्मलेले म्हणून करज. 'ज' हे जन्मणे या क्रियापदाचे संक्षिप्त रूप आहे.


# आता उजाडेल!

**जयश्री काटीकर**
मराठी विषय अध्यापक, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
भ्रमणध्वनी : ९४२२७८८०८५

*कविता आणि कवितेचे अध्यापन हे भाषेतील महत्त्वाचे घटक आहेत. कविता कशी शिकवावी, हे कळत नसल्यामुळे पुष्कळदा शिक्षक कविता वाचून दाखवतात. हे शिकवणे नाही, यामुळे मुलांना कवितेतील आशयाचे आकलन होत नाही, यासाठी कवितेचे अध्यापन कसे करावे, याबाबतचे मार्गदर्शन प्रस्तुत लेखात केले आहे.*

कविता... केवळ तीन अक्षरी शब्द! पण भल्याभल्यांना पुरून उरणारा! 'जमलं तर सूत, नाही तर भूत' असा काहीसा प्रकार! कोणाच्या अगदी काळजातला हळुवार, तर कुणाच्या कपाळावर आठ्या आणणारा हा प्रकार! जसे व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणतात, त्याच धर्तीवर व्यक्ती तितक्याच कवितेला भिडणाऱ्या प्रकृती, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये.

मग आपण शिक्षक म्हणून मुलांना कवितेपर्यंत कोणत्या प्रकृतीने, कोणत्या पद्धतीने घेऊन जायचे? कोणत्या वळणाने कवितेपर्यंत त्यांना पोहोचवले तर दोघांत मैत्र जुळेल? असे असंख्य प्रश्न वर्गात जाताना, विशेष करून कविता शिकवताना, दरवेळी मनात असतात. आताच्या आधुनिक ज्ञानसंरचनावादाप्रमाणे आपण शिक्षक म्हणजे केवळ मार्गदर्शक! वर्गात थेट कविता शिकवणे, अर्थ सांगणे हे अपेक्षितच नाही. त्यामुळे तो तसा सांगणे, हे शक्यतो टाळण्याकडेच माझा कल; पण म्हणूनच कविता मुलांपर्यंत अधिक गांभीर्याने पोहोचवली पाहिजे याची जबाबदारी वाढतेच. पाचवी-सहावीच्या छोट्या-छोट्या मुलांना कवितेशी कसे बरे जोडता येईल? कवितेबरोबर त्यांना एकटे सोडून द्यायचे, तर तोही धीर होत नाही. कवितेतील मौज त्यांना कळलीच नाही तर! कविता म्हटल्यावर भविष्यातही त्यांच्या कपाळावर आठ्या पडायला नको, यासाठी ही सगळी धडपड. त्यासाठी मी काय करते, तर प्रत्येक कवितेची छोटी-छोटी उद्दिष्टे ठरवते. ते उद्दिष्ट एकदा गाठले, की शिक्षक म्हणून आपले अवतारकार्य संपले, असे समजून मुलांना कवितेबरोबर बागडू द्यायचे, खेळू द्यायचे आणि मग कवितेबद्दल मुलांकडून भरभरून ऐकताना तृप्त होऊन जायचे.




'आता उजाडेल' ही मंगेश पाडगावकर यांची इयत्ता सहावीला असणारी कविता. सहावीच्या मानाने कळायला थोडी जड! कसे मुलांना एकटे सोडणार कवितेबरोबर! यावर्षीचा माझा अनुभव....

सुरुवातीला रात्र–काळोख आणि पहाट–उजेड–उजाडणे हे शब्द दोन रकाने करून फळ्यावर लिहिले. हे शब्द उच्चारल्यावर काय काय आठवते, त्याला पूरक शब्द कोणते, याची आम्ही वर्गात यादी केली. आधी कोणालाच काही सुचले नाही; पण 'ज्योत से ज्योत जगाओ...' प्रमाणे एकाने सांगितल्यावर हळूहळू भरपूर शब्दांची यादी तयार झाली. ती आधी बघूया. यादी अर्थातच या क्रमवारीने नव्हती.

**रात्र :** झोप, निशा, स्वप्ने, विश्रांती, आराम, घोरणे, चंद्र, चांदणे, तारे, नक्षत्र, कृष्ण (?), आकाश, ग्रहण, अमावस्या, आभाळ, वटवाघूळ, घुबड, किडे/रातकिडे, भेडिया, कुत्र्याचे रडणे, भूतपिशाच, चोर, राक्षस, दिव्याखाली अंधार, आयुष्यातला अंधार, असुरक्षित, शून्यता, भूतकाळ, भीती, दुष्ट, संकट, अज्ञान, धडपडणे, थकणे, भुयार, मंद गटाराचे काळे पाणी, दल इत्यादी.

**सकाळ :** सूर्य, उठणे, गजर, भूपाळी, योगा, व्यायाम, देव, प्रकाश, उजेड, ढग, आकाशाचा रंग, दृश्य दवबिंदू, थंड हवा, आभाळ, निसर्ग, पक्षी, किलबिलाट, शनिवारची शाळा, अंघोळ, आवरणे, आईचा आवाज, ज्ञान सक्रिय करणे, सुरुवात, तेज, तेजस्वी, आशा, उगम, नवा दिवस, चिंतन, अभिलाषा, प्रसन्न, लाल/पिवळा रंग, ज्ञानाचा सविता इत्यादी.

'ज्ञानाचा सविता' हा मुलांच्या एका पद्यातला शब्द; पण तो इथे असा आठवला याचे कौतुक वाटले. वेगळ्या ठिकाणी ऐकलेल्या शब्दांचे उपयोजन त्यांना करता आले याचे समाधान मिळाले. रात्रीसाठी सुचलेले शून्यता, भुयार, मंद, गटाराचे काळे पाणी; आणि पहाट यासाठी सुचलेले शनिवारची शाळा, आईचा आवाज, चिंतन या शब्दांची गंमत वाटली. माझे काम कितीतरी पटींनी सोपे झाले होते.

*खिन्न आंधळा अंधार,*
*आता ओसरेल पार...*
*आता उजाडेल!*

या कवितेच्या ओळी फळ्यावर लिहिल्या. या ओळींमधला 'अंधार' आणि 'उजाडणे' या शब्दांचा अर्थ आपण समजून घेतला आहे. आता या ओळींचा अर्थ पुढच्या तासाला येताना तुम्हाला जसा वाटतो, तसा लिहून आणा, असे सांगून शिक्षक म्हणून माझे अवतारकार्य मी संपवले. आता मुले कसे आणि काय काय लिहून आणतात, याबद्दल उत्सुकता होती.

त्यांच्या छोट्याशा मेंदूतून अर्थाची वेगवेगळी फुलपाखरे उडाली होती. त्यांनी लिहून आणलेले काही अर्थ :

(१) जेव्हा आपण बुद्धिबळात हरायला आलोय; पण आपल्याला एक चाल सुचते आणि आपण जिंकतो.

(२) आता खोलीचे पडदे बंद आहेत; म्हणून अंधार आहे; पण थोड्या वेळात पडदे बाजूला केले, की प्रकाश येणार आहे किंवा आता कोणी संकटात आंधळा आहे, काहीच आशा दिसत नाहीये; पण थोड्या वेळात संकट जाणार आहे.

(३) दिवे गेले आहेत आणि वीज थोड्याच वेळात येणार आहे. सगळीकडे प्रकाश पसरणार आहे किंवा गणेशोत्सवानंतर दिवाळी येणार आहे. गणेशोत्सवानंतर शांत वातावरण असते सगळीकडे; पण थोड्याच दिवसांत दिवाळी येणार आहे. दिवाळी आल्यावर संकट जाईल, आशा निर्माण होईल.

(४) आपली खोली म्हणजे आपले मन. खोलीतील पडदा म्हणजे आपली इच्छा. पडद्यातून येणारा

प्रकाश म्हणजे आशा. आपली इच्छा असेल, तर कोणत्याही परिस्थितीत आपण आशा सोडायची नसते. आपली इच्छा असल्यास आपण अंधार करणारे पडदे बाजूला करू शकतो आणि आपले मन आनंदाने भरू शकतो.

(५) अंधार कोणताही असेल रात्रीचा किंवा अज्ञानाचा. खिन्न, घोर अंधार आता तो पार ओसरेल, लांब जाईल एकदाचा तो. अंधार, वाईट वेळ, अज्ञान आता जाईल पार आणि उजेड, ज्ञान, चांगली वेळ येईल.

(६) खिन्न, आंधळ्या अंधारामध्ये आपल्याला काहीच दिसत नाही. तसेच संकटांमध्येसुद्धा आपल्याला काहीच सुचत नाही आणि दुःख होते. हे दुःख ओसरेल पार आणि आता सुख येईल.

(७) आता रात्र आहे; पण थोड्या वेळात उजाडणार आहे. दुसरा अर्थ – अंधार म्हणजे संकट आणि पहाट म्हणजे आधार! एखाद्या माणसावर संकट आलेले असू शकते; पण थोड्या वेळात ते जाणार आहे. ही कविता हेही दर्शवते, की संकट कायमचे नसते. थोड्या वेळाने विजय होणार आहे. अंधार म्हणजे दुःख. थोड्याच वेळात दुःख जाणार आहे.

(८) आंधळ्याला सगळीकडे अंधार दिसतो; पण त्याने देवाची भक्ती केली. देवाने त्याला वरदान दिले आणि त्याचे अंधत्व गेले.

(९) वाईट काळात; न थांबता आपण आपले काम करत राहिले पाहिजे. गरीब माणूस जर तसाच बसून राहिला, तर त्याची प्रगती होणार नाही.

(१०) वाईट दिवस जाऊन चांगले दिवस येतील.

(११) दुःखी माणूस, ध्येय विसरलेला, भरकटलेला माणूस, ज्याचे जीवन खूप खडतर झाले आहे. त्यालासुद्धा आता आशा मिळणार; कारण दुःख कायमचे नसणार व कधीतरी सुखाचे दिवस येणार आहेत.

(१२) रात्री सर्वत्र काळाकुट्ट अंधार असतो. मानवनिर्मित दिव्यांव्यतिरिक्त कुठेही नैसर्गिक प्रकाशाचा मागमूस नसतो; पण एक मात्र नक्की असते. काळोख्या रात्रीनंतर दिवस उजाडतो. काळोख्या रात्रीचा काळ आपल्या संकटांचा, अडचणींचा आणि आपल्या अपयशांचा काळ असतो. सूर्य अग्रेसर झाल्यावर ज्याप्रमाणे लख्ख प्रकाश पडतो, त्याप्रमाणे योग्य वेळ आली, की आपली संकटे नाहीशी होतात. अडचणीतून यशाचा मार्ग सापडतो. अपयशाचे परिवर्तन प्रकाशात होते. उदास वाटणारा अंधार ओसरतो आणि प्रकाशमय दिवस उजाडतो.

किती भरभरून लिहिले आहे मुलांनी! गणेशोत्सवानंतरचा 'काहीच न घडणारा' काळ म्हणजे पितृपक्षाचा काळ! हा विशिष्ट काळ मुलांना अशा पद्धतीने जाणवतो, हे या निमित्तानेच लक्षात आले. किती बारकाईने निरीक्षण करतात मुले! आणि मग दिवाळी म्हणजे भरपूर काही 'घडामोडी' असणारा काळ! आनंदाचा, उत्साहाचा, प्रसन्नतेचा! आपली खोली म्हणजे आपले मन ही कल्पनाही किती विलक्षण आहे! ओसरेल पार, या शब्दाचा किती थेट अर्थ लांब जाईल एकदाचा तो'.... या शब्दांतून आपल्यापर्यंत पोहोचतो. बुद्धिबळासारख्या खेळात हरायला आलो असताना आपल्याला एक चाल सुचणे आणि त्याची तुलना पहाटेशी करणे हे केवळ मुलेच करू जाणे. आपल्यासारख्यांचे ते कामच नाही. या सगळ्यांमुळे कवितेकडे बघण्याची आपलीही दृष्टी बदलते, एखादा वेगळाच पैलू समोर येतो आणि शिक्षक नावाच्या

चौकटीतून आपण आपसूकच बाहेर येतो. मुले आणि आपण आस्वादकाच्या एकाच पातळीवर येऊन उभे आहोत, हेही उशिराने कळते. मुलांबरोबर आपणही 'मोठे होत असतो, याची वारंवार प्रचिती येते!

मध्यंतरी मी वाईला एका प्रशिक्षणासाठी गेले असताना शिक्षकांसाठी कवितांवर एक सत्र घेत होते. सत्र झाल्यावर प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात एका शिक्षकांनी विचारले, 'पाठ्यपुस्तकातील विशिष्ट बोलीमधल्या कविता मुलांना समजत नाहीत आणि आवडतही नाहीत. काय करावे?' माझा त्यांना उलट प्रश्न असा होता, की पाठ्यपुस्तकातील प्रत्येक कविता मुलांना आवडलीच पाहिजे का हो? आपला हा अट्टहास कशासाठी? मारून मुटकून कविता आवडली पाहिजे यासाठीच सगळा खटाटोप आपण केला, तर मुलांच्या कपाळावर आठ्या पडायला कितीसा वेळ लागणार! पण मग यावर उपाय काय? मग मी त्यांना सुचवले ते असे – बोलीभाषेतील या कवितेचा साधारण अर्थ सांगून प्रमाणभाषेत मुलांना ती कविता करायला सांगू शकतो. पुस्तकाच्या पानावरच त्या कवितेच्या शेजारी ती लिहायला सांगितली, तर समजण्याच्या प्रश्नावर उत्तर तर मिळेल. मुलांना कविता आवडावी यासाठी जंग जंग पछाडण्यापेक्षा आपण त्या कवितेपुरते उद्दिष्टच बदलले तर? या कवितेच्या निमित्ताने बोलीभाषा म्हणजे काय, तिचे महत्त्व, विशिष्ट बोलीभाषकांचे प्रश्न, ते प्रश्न सोडवण्यासाठी चाललेले प्रयत्न या सगळ्यांबद्दल मुलांना एक दृष्टी देणे, त्याबद्दल मुलांना सजग करणे, त्यांची समज वाढवणे, संवेदनशीलता वाढवणे हे कितीतरी मोठे उद्दिष्ट आपल्या डोळ्यांसमोर ठेवता येईल. त्या कवितेशिवाय अशी संधी तरी कधी व कशी मिळणार आपल्याला? बरोबर ना?

❑❑❑

## भाषिक खेळ

**लक्ष्मण शेडगे**
मु. पो. भरतगाव, ता. जि. सातारा.
भ्रमणध्वनी : ८३०८३०४३७२

खालील चौकोनात दिलेल्या अक्षरांतून रिक्त जागी अचूक अक्षर लिहून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

**चे, ने, जी, वि, द, रा, न, ता, ना,**
**श, प, ल, सु, अ, नि, उ, प्र, आ**

| | | |
|---|---|---|
| ____ | गा | म |
| ____ | व | न |
| ____ | भ | य |
| ____ | र | द |
| ____ | त | न |
| ____ | गा | रा |
| ____ | व | ण |
| ____ | पा | त |
| ____ | लु | का |
| ____ | क | ष |
| ____ | सा | द |
| ____ | ता | जी |
| ____ | रा | ग |
| ____ | जि | त |
| ____ | ल्हा | द |
| ____ | सा | वा |
| ____ | ता | ळ |
| ____ | रा | ज |

❑❑❑

**नारायण शिंदे**
जि. प. प्राथ. शाळा वाडावेसराड, ता. संगमेश्वर,
जि. रत्नागिरी.

**प्रस्तावना :**

पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसनासाठी दि. ५ जुलै, २०२१ रोजी भारत सरकार पुरस्कृत निपुण भारत (NIPUN - National Initiative for Proficiency in reading with Understanding and Numeracy) अभियानाची सुरुवात झाली. निपुण भारत अभियानांतर्गत मुलांचा प्राथमिक शाळेतील प्रवेश सहज आणि आनंददायी होण्यासाठी इयत्ता पहिलीतील सुरुवातीच्या तीन महिन्यांसाठी (१२ आठवडे) विद्याप्रवेश कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. यासाठी स्थानिक खेळ, खेळाचे साहित्य व त्याच्याशी संबंधित कृतींचा उपयोग करण्यावर अधिक भर देण्यात आला आहे.

दि. १७ जून, २०२२ रोजी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत विद्याप्रवेश शाळापूर्व तयारी – इयत्ता पहिलीसाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत अतिशय चांगल्या प्रकारे विद्याप्रवेश या बाबतीत सर्व माहिती देण्यात आली. विकासात्मक ध्येय १, २, ३ उत्तम आरोग्य व स्वास्थ्य, प्रभावी संवादक व सक्रिय अध्ययनार्थी बनण्यासाठी १२ आठवड्यांचे नियोजन विद्याप्रवेश शिक्षक मार्गदर्शिकेत देण्यात आल्यामुळे, विद्यार्थ्यांकडून कृतिपुस्तिका सोडवून घ्यायला दिशा मिळाली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाडावेसराड, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या शाळेत पालकसभा घेऊन त्यांना विद्याप्रवेशाची माहिती दिली. पालकांना घरी प्रत्येक कृती कशाप्रकारे करून घ्यायची, या बाबतीत माहिती दिल्यामुळे कृती करून घ्यायला आणखीन सोपे झाले. विद्यार्थी शाळेत व घरी दोन्ही ठिकाणी सराव करायला लागले, त्यामुळे १२ आठवडे केलेल्या नियोजनाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यश मिळाले.

> *राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० नुसार भारत सरकारने 'निपुण भारत अभियान' सुरू केले. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान विकसन यांसाठी १२ आठवड्यांचा कालावधी निर्धारित करून कार्यक्रमाची आखणी केली. इयत्ता पहिलीमध्ये दाखलपात्र मुलांना प्रवेशासाठी प्रोत्साहित केले व पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसन उद्दिष्टे साध्य केली, याबद्दलची माहिती या लेखात दिली आहे.*


**उद्दिष्टे :** राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार, इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश करणारी सर्व मुले शालेय शिक्षणासाठी तयार असावीत, या हेतूने इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी तीन महिन्यांचा खेळ–आधारित विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रम राबवीत असताना खालील उद्दिष्टे ठरविली.

(१) इयत्ता पहिलीमध्ये दाखलपात्र सर्व मुलांना शाळा प्रवेशासाठी प्रोत्साहित करणे.

(२) निपुण भारत अंतर्गत ३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, अभिप्रेत असलेल्या

क्षमता, पालक व समाजाच्या सहकार्यातून विकसित करणे.

(३) मुलांचा इयत्ता पहिलीमधील प्रवेश सहज व आनंददायी करणे.




(४) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंददायी आणि उत्साही वातावरणात वयानुरूप व खेळ–आधारित शैक्षणिक अनुभव देणे.

**गरज :**

- कोरोना काळात सर्व अंगणवाड्या व बालवाड्या बंद होत्या, त्यामुळे अध्ययन प्रक्रियेमध्ये नव्याने प्रवेशित झालेल्या मुलांच्या अध्ययनात सातत्य न राहिल्याने अध्ययन ऱ्हास (Learning Loss) झाल्याचे दिसून येते.
- काही मुले अनेक कारणांमुळे अंगणवाडीमध्ये जाऊ शकत नाहीत. पर्यायाने त्यांची शिकण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पूर्वतयारी होत नाही. अशा मुलांनासुद्धा शिक्षण प्रवाहात आनंदाने सहभाग घेता यावा.
- बहुवर्ग अध्यापनासाठी उपयुक्त कृतींचा समावेश असल्याने ३ ते ९ वर्षे वयोगटातील मुलांच्या क्षमता पूर्ण करणे.
- सर्व मुलांना शाळेची गोडी लागावी. बाल मानसशास्त्रानुसार श्रवण, वाचन, लेखन, गणन इत्यादी कौशल्ये योग्य रीतीने विकसित व्हावीत, तसेच अभिव्यक्तीला वाव मिळावा.
- पूर्वप्राथमिक शिक्षणाकडून प्राथमिक शिक्षणाकडे मुलांचा प्रवास सहजतेने व्हावा.
- माता–पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यात समन्वय साधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा.

**कार्यक्रम अंमलबजावणी :** जि. प. प्राथ. शाळा, वाडावेसराड, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी या शाळेत दि. २० जून, २०२२ ते १० सप्टेंबर, २०२२ अखेर विद्याप्रवेश कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी १४ जूनचे परिपत्रक आले. दि. १७ जून, २०२२ रोजी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत विद्याप्रवेश शाळापूर्व तयारी–इयत्ता पहिलीसाठी कार्यशाळा घेण्यात आली. विद्याप्रवेश कार्यक्रम समजून घेण्यास या कार्यशाळेची खूप मदत झाली. प्रथम पालकसभा घेऊन पालकांना विद्याप्रवेशाची माहिती देण्यात आली. पालकांनी घरी मुलांकडून प्रत्येक कृती कशाप्रकारे करून घ्यायची याबाबत सविस्तर माहिती दिली. मी स्वतः अगोदर विद्याप्रवेश, शिक्षक मार्गदर्शिकेतील कोडिंग भाषा समजून घेऊन प्रत्येक आठवड्याचे नियोजन केले.

**विकासात्मक ध्येय १ :** मुले उत्तम आरोग्य व स्वास्थ्य राखतात. (HW) समाविष्ट कृतींची संख्या – ६८.

**विकासात्मक ध्येय २ :** मुले प्रभावी संवादक बनतात. (ECL) समाविष्ट कृतींची संख्या – ८१.

**विकासात्मक ध्येय ३ :** मुले सक्रिय अध्ययनार्थी बनतात आणि त्यांच्या लगतच्या परिसराशी जोडली जातात. (IL) समाविष्ट कृतींची संख्या – ६८.

अशा एकूण २१७ कृतींचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांकडून प्रत्येक कृतीचा सराव करून घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला अडचणी आल्या. शेतीच्या

कामाचे दिवस असल्यामुळे पालकांचे सहकार्य मिळत नव्हते. वारंवार पालकभेटी घेऊन त्यांना विद्याप्रवेश संबंधीची माहिती पुन्हा पुन्हा दिली. कृतीत पालक सहभागी झाल्यामुळे पालकांचा उत्साह वाढू लागला आणि पालकांचे सहकार्य मिळू लागले. प्रत्येक शनिवारी होणाऱ्या पालकसभेत, येणाऱ्या अडचणींवर चर्चा करून, त्या कृती कशा पूर्ण करून घेता येतील याचा विचार करत साहित्य निर्मिती व पुढील आठवड्याचे नियोजन करू लागलो.

कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी साप्ताहिक व दैनंदिन वेळापत्रक देण्यात आले होते. यामध्ये मुलांच्या छोट्या व मोठ्या गटातील कृती, (घरातील, बाहेरील), घरातील किंवा सभोवतालच्या परिसरातील वस्तूंची खेळणी तयार करून किंवा साहित्य जमा करून घेण्यात आले. वर्गामध्ये मुलांना साहित्य सहज हाताळता येईल या पद्धतीने वर्गरचना करण्यात आली. स्वागत भेट, परिपाठ (Circle time), मुक्त खेळ, वर्गाबाहेरील खेळ, निरोप खेळ यांसारख्या कृती रोज घेतल्यामुळे मुलांच्या अभिव्यक्तीला वाव मिळाला.

वर्गातील सर्व कृतींचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर पाठवल्यामुळे विद्याप्रवेशासंदर्भात अनेक शिक्षक माहिती विचारू लागले. इयत्ता पहिलीच्या संदर्भात व्हॉट्सॲप समूहावर (Group) चर्चा करू लागले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षक या समूहात समाविष्ट होते. दिनांक २७ जून, ३ जुलै, २४ जुलै, ८ ऑगस्ट व १८ सप्टेंबर रोजी झूम मीटिंगद्वारे एकूण १,२५५ शिक्षकांशी चर्चा करण्यात आली. यासाठी श्यामला दळवी व प्राची बोगम (एन.जी.ओ.), पुणे यांचेही सहकार्य लाभले. त्यांनी समूहातील शिक्षकांशी चर्चा केली, तसेच वेळोवेळी विद्याप्रवेशासंदर्भात काही शंका आल्यास डॉ. राजेश बनकर, उपविभागप्रमुख, मराठी विभाग (SCERT), पुणे. यांनीदेखील मार्गदर्शन केले. ज्योत्स्ना खोजे, वैशाली डेरे, ज्ञानदा परदेशी यांचेही सहकार्य लाभले. त्यामुळे शिक्षकांच्या अनेक प्रश्नांचे समाधान करण्यास मदत झाली.

मुलांचा सर्वांगीण विकास व शाळापूर्व तयारीसाठी दिलेल्या १२ आठवड्यांच्या वेळापत्रकानुसारच अंमलबजावणी करण्यात आली. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या मुलांची शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्वसाक्षरता, संख्याज्ञान, बोधात्मक आणि सामाजिक कौशल्ये विकसित करण्यासाठी विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) हा १२ आठवड्यांचा कार्यक्रम राबविण्यात आला. तसेच माझ्याकडे अध्यापनासाठी इयत्ता पहिली, दुसरी व तिसरी असे तीन वर्ग असल्याने विद्याप्रवेश कार्यक्रमातील कृतींचा उपयोग इयत्ता पहिलीबरोबरच इयत्ता दुसरी व तिसरीसाठीही झाला. विद्याप्रवेश (शाळापूर्व तयारी) कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना पालकही सक्रिय झाले.

**फलनिष्पत्ती :** सदर कार्यक्रम प्रचलित अभ्यासक्रमाशी सुसंगत असल्यामुळे अपेक्षित अध्ययननिष्पत्ती साध्य करण्यासाठी फायदेशीर ठरला. भाषण, संभाषण आणि वाचन ही कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्वसाक्षरता, संख्याज्ञान, बोधात्मक आणि सामाजिक कौशल्ये विकसित झाली व बहुवर्ग (जोडवर्ग) अध्यापनासाठी हा कार्यक्रम उपयुक्त ठरला. अशाप्रकारे विद्याप्रवेश शाळापूर्व तयारी हा कार्यक्रम दाखल विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त ठरला.

**समारोप :** विद्याप्रवेश शाळापूर्व तयारी शिक्षक मार्गदर्शिकेत नमूद केलेल्या सर्व कृती निपुण भारत अभियानातील विकासात्मक ध्येयांशी सुसंगत आहेत, त्यामुळे ३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत साक्षरता आणि अभिप्रेत असलेली संख्याज्ञान क्षमता विकसित करण्यास मदत झाली व पालकही सक्रिय झाले.

❑❑❑

# माझी शाळा, माझी परसबाग

**भीमराव शिंदे**
जि. प. प्राथ. शाळा बालवडी, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : ९८२२८८६२६२

दि. २९ मे, २०१८ रोजी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बालवडी येथे पदवीधर शिक्षक म्हणून रुजू झालो. भव्य असा शालेय परिसर पाहून मन प्रसन्न झाले. सध्या शाळांमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मीही 'माझी शाळा, माझी परसबाग' हा उपक्रम हाती घेतला. सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक व शाळा व्यवस्थापन समिती यांना या उपक्रमाची संकल्पना सांगितली. आगळावेगळा आणि विद्यार्थी हिताचा उपक्रम असल्याने तो सर्वांना आवडला. शाळेत हा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.

परसबाग तयार करण्यासाठी शालेय परिसरातील मोकळ्या जागेत ग्रामस्थांच्या सहकार्याने श्रमदानातून मशागत करून जमीन लागवडीसाठी तयार केली. ट्रॅक्टरच्या साहाय्याने, आवश्यक तेवढी माती आणून परसबागेत पसरवून घेतली.



नर्सरीमधून कोबी, फ्लॉवर, वांगी, मिरची, टोमॅटो इत्यादी फळभाज्यांची रोपे आणून परसबागेत लावली. कार्यानुभवाच्या तासाला विद्यार्थी परसबागेची काळजी घेऊ लागले. झाडांना पाणी घालणे, खुरपणी करणे, सेंद्रिय खत घालणे ही कामे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये एकप्रकारे स्पर्धा लागली. मुले शाळा सुरू होण्यापूर्वी,

*ग्रामीण भागातील शाळांमधून शिक्षक विविध प्रकारचे उपक्रम राबवत असतात. जि. प. प्राथ. शाळा बालवडी येथील शिक्षकाने एक आगळा-वेगळा उपक्रम घेतला. 'माझी शाळा, माझी परसबाग' असे या उपक्रमाचे नाव आहे. या उपक्रमामुळे मुलांचा फायदा कसा झाला, त्यांचे आरोग्य कसे सुधारले व अंतिमत: शाळेतील मुलांची उपस्थिती कशी वाढली, याची माहिती येथे दिली आहे.*

दुपारी जेवणाच्या सुट्टीत आणि शाळा सुटल्यानंतर परसबागेतील रोपांची मशागत करू लागली. यातून विद्यार्थ्यांना शेतीविषयक शिक्षण मिळाले.

रोपे कोणत्या जातीची घ्यावी, त्यांची लागवड अशी करावी? त्यांना पाणी किती आणि कसे द्यावे? खुरपणी कशी करावी? सेंद्रिय खतांचा वापर कसा करावा? इत्यादी. शेती शिक्षणाची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. रासायनिक शेती आणि सेंद्रिय शेती यांतील फायदे-तोटे विद्यार्थ्यांना समजले.

साधारणतः तीन महिन्यानंतर परसबागेतील कोबी, मिरची, वांगी, टोमॅटो या भाज्यांचे भरघोस पीक

**(पृष्ठ क्र. ३६ वर)**

# उपक्रमातून गुणवत्तावाढीकडे : एक मूल, एक झाड

**भागीनाथ बडे**
जि. प. प्राथ. शाळा सोमठाणे नलवडे, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ८३२९८९०६३३

*जि. प. प्राथ. शाळा सोमठाणे नलवडे या शाळेमध्ये एक मूल, एक झाड हा अभिनव उपक्रम राबवला गेला. शाळा ग्रामीण भागातील असल्यामुळे पालकांची आर्थिक स्थिती चांगली नव्हती. शिक्षकांनी स्वतः खर्चाचा भार उचलला आणि हा उपक्रम यशस्वी केला. पर्यावरणविषयक जागृती निर्माण होण्याबरोबरच शाळेत शैक्षणिक वातावरणाची निर्मिती झाली. अभ्यासात मुलांची उत्तम प्रगती दिसू लागली.*

प्रशासकीय बदलीने मी जून २०१८ मध्ये जि. प. प्राथ. शाळा, सोमठाणे नलवडे येथे पदवीधर शिक्षक या पदावर रुजू झालो. शालेय परिसर अगदीच रूक्ष दिसत होता. एकूणच वातावरण उदास वाटत होते. शालेय परिसर नीटनेटका नसल्यामुळे मुलांची उपस्थिती कमी असायची व उपस्थित मुलेसुद्धा दिवसभर कंटाळून जात असत. शाळेच्या परिसरात चैतन्य निर्माण करण्यासाठी वृक्षारोपण करण्याची आवश्यकता मला वाटली.

## उपक्रमाची गरज :

शाळेतील मुलांच्या घरची आर्थिक परिस्थिती ही अत्यंत गरिबीची होती. हातावर पोट असणाऱ्या पालकांची मुले शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत, हे लक्षात आले. गाव-खेड्यातील मुलांना निसर्ग आवडतो. सर्व शिक्षण आपण निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन देऊ शकत नाही; परंतु आपल्या शाळेच्या परिसरामध्ये आपण नैसर्गिक वातावरण तयार करू शकतो. शाळा सजीव करू शकतो. वेगवेगळ्या झाड-वेलींनी शाळेमध्ये एक सुंदर बाग निर्माण करू शकतो. त्यासाठी फक्त मनापासून कष्ट करण्याची आवश्यकता असते आणि मी ते करण्याचे ठरविले, कारण गोरगरिबांची मुले शाळेमध्ये नियमित आली पाहिजेत, ती शाळेत टिकली पाहिजेत व त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे, हा शिक्षणाचा उद्देश साध्य होणे आवश्यक होते. हे लक्षात घेऊन शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी पोषक असाच हा वृक्षारोपणाचा उपक्रम मी माझ्या शाळेत राबविण्याचे ठरविले. सर्वप्रथम शाळेच्या परिसरामध्ये मुलांच्या पटसंख्येइतकी म्हणजे १५० झाडे लावण्याचे ठरविले.

## उपक्रमाची सुरुवात :

सुरुवातीला आयुर्वेदामधील उपयुक्त औषधी वनस्पतींची लागवड करण्यास सुरुवात केली. अगदी पहिल्यांदा 'अर्जुन' या वृक्षाचे रोप शाळेतील प्रांगणात लावले. त्याची देखभाल विद्यार्थ्यांच्या सहभागातून करीत राहिलो. चार-पाच महिन्यांत अर्जुन वृक्षाचे रोप मुळे पकडून जोमाने वाढू लागले आणि ज्या शाळेच्या प्रांगणामध्ये झाडे लावल्यानंतर जळून जातात असा इतरांचा अनुभव होता, त्याउलट मला अनुभव आला. तो अर्जुन वृक्ष त्या ठिकाणी जोमाने वाढताना दिसला. त्या वृक्षाने मला जास्तीतजास्त झाडे लावण्याची प्रेरणा दिली.

## अडचणींवर मात :

झाडे लावायची तर पाणी लागणार; परंतु शाळेत पाण्याची सुविधा उपलब्ध नव्हती. ग्रामपंचायतीचे

पाण्याचे एक कनेक्शन होते; परंतु त्याला नियमितपणे पाणी येत नव्हते. महिन्यातून दोन-चार वेळेसच नळाला पाणी यायचे आणि शाळेमध्ये पाणी साठवण्याची सोय नव्हती. मुलांना दैनंदिन स्वच्छतेसाठी, तसेच पिण्यासाठी पाण्याची सुविधा शाळेमध्ये उपलब्ध नव्हती. शाळेतील मुलांचीच पिण्याच्या पाण्याअभावी आबाळ व्हायची, त्यामुळे झाडांना पाणी कोठून आणायचे हा प्रश्न बिकट होता. हा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी शाळेमध्ये पाण्याची साठवणूक करण्याकरिता टाकी बसविण्याचा निर्णय घेतला. प्रथम ३०० लीटर क्षमतेच्या दोन टाक्या व दोन हौद जोडण्याचे नियोजन केले. त्यासाठी लागणारा सुमारे दहा हजार रुपयांचा खर्च मी स्वतः केला आणि शाळेमध्ये एकाच वेळेस २००० लीटर पाणी साठविण्याची सोय झाली. मधल्या सुट्टीत मुले जेवणापूर्वी हात धुताना जे पाणी पडत असे, ते बादलीमध्ये साठवून प्रत्येक झाडाला थोडे थोडे पाणी घालण्याचा प्रयोग त्या ठिकाणी सुरू केला आणि बघता बघता शाळेच्या प्रांगणामध्ये लावलेली झाडे मुलांच्या हात धुण्याच्या पाण्यावर वाढू लागली. शाळेच्या प्रांगणामध्ये दीडशे ते दोनशेपेक्षा जास्त झाडे-झुडपे बहरू लागली. ते पाहून मुलांची मनेसुद्धा प्रफुल्लित होऊ लागली.

### कोरोना संकट :

दरम्यानच्या काळात कोरोना महामारीची साथ सुरू झाल्यामुळे सुमारे एक ते दीड वर्षे शाळा प्रत्यक्षात सुरू नव्हती; परंतु त्या काळातही शाळेतील झाडांना गावातील काही विद्यार्थ्यांच्या मदतीने नियमितपणे पाणी घालत राहिलो आणि झाडे हळूहळू वाढत गेली. आता कोरोनानंतर शाळा सुरू झाल्या आहेत. शाळेतील बाग अत्यंत हिरवाईने नटलेली आहे. आता मुले दिवसभर आनंदाने शाळेच्या परिसरामध्ये अभ्यास करतात. मुलांना शाळा सुटली तरी घरी जावे असे वाटत नाही. शाळेतील झाडांना वेगवेगळी फुले आलेली पाहून मुले खूश होतात. शाळेच्या परिसरात चेरीची फळे खाण्यासाठी कोकिळ पक्षी शाळा चालू असताना झाडांवर येऊन बसतात. फळे खातात आणि त्याबरोबर सुंदर अशी साद घालतात. मोकळ्या वेळेत मुले या पक्ष्यांचे निरीक्षण करतात. झाडांचे निरीक्षण करतात. झाडांच्या वाढीचे निरीक्षण करतात. झाडांना पाणी घालतात.



बेहडा, आवळा, अडुळसा, चिंच, बोर, पिंपळ, पारिजातक, तुळस, जास्वंद, उंबर, जांभूळ, शिसम, चेरी, गुलमोहर, वड, कांचनार, काशिद, करंज इत्यादी प्रकारच्या वैविध्यपूर्ण, आयुर्वेददृष्ट्या उपयुक्त वृक्षांनी शाळेची बाग बहरली आहे.

### उपक्रमाचे फलित :

(१) शाळेमध्ये राबविलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण झाली आहे.

(२) झाडे आपले मित्र आहेत, झाडे आपल्याला ऑक्सिजन देतात, झाडे आपल्याला अनेक प्रकारे उपयोगी पडतात. फळे देतात, सावली देतात, शुद्ध हवा देतात हे मुलांच्या लक्षात आले.

(३) झाडांच्या सहवासात अभ्यास चांगला होतो. खेळताना, बागडताना झाडांची सोबत मुलांना आवडते.

(४) झाडांमुळे शाळेचा परिसर सुशोभित झाल्यामुळे शाळेतली उपस्थिती वाढून शाळेची गुणवत्ताही वाढू लागली आहे.

(५) इयत्ता आठवीचा विद्यार्थी शिष्यवृत्ती २०२० च्या परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे.

(६) त्यानंतर २०२० मध्ये एनएमएम या परीक्षेमध्ये इयत्ता आठवीची कु. सारिका थोरात ही विद्यार्थिनी ४८ हजार रुपये शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेली आहे.

(७) तसेच तालुका स्तर, जिल्हा स्तर विविध क्रीडा स्पर्धांमध्ये मुलांनी क्रमांक मिळविलेले आहेत.

(८) विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये शाळेतील विद्यार्थी तालुका स्तर व जिल्हा स्तरावर नावलौकिक मिळवीत आहेत.

❑❑❑

**(पृष्ठ क्र. ३३ वरून)**

आले. टोमॅटोच्या एकेका झाडाला पन्नास ते पंचावन्न टोमॅटो आले होते. आजपर्यंत गावात कोणत्याही शेतकऱ्याने कोबीचे पीक घेतले नव्हते, त्यामुळे शाळेच्या परसबागेतील कोबी पाहण्यासाठी ग्रामस्थ शाळेत येऊ लागले. शाळेविषयी ग्रामस्थांना आपुलकी वाटू लागली.

परसबागेत तयार झालेल्या फळभाज्यांचा उपयोग 'शालेय मध्यान्ह भोजन' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या दुपारच्या जेवणात होऊ लागला, त्यामुळे जेवण अधिक चवदार झाले. मुलांना पौष्टिक घटक अधिक मिळू लागले. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती वाढली. मुलांचे आरोग्य सुधारण्यास मदत झाली व अभ्यास करण्याबाबत उत्साह वाढला.

आमच्या शाळेतील या उपक्रमाची नोंद विविध वृत्तपत्रांनी घेतली, तसेच झी २४ तास व टीव्ही ९ या वृत्तवाहिन्यांनी परसबागेचे वृत्त प्रसारित केले.

माझी शाळा, माझी परसबाग हा उपक्रम विद्यार्थी–हिताचा असून तो कमी खर्चात, कमी वेळेत, कमी पाण्यावर आणि वर्षभर राबविता येणारा उपक्रम आहे.

❑❑❑

## वर्गणीदार होण्यासाठी

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/– (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# मुंबई राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या योजना

डॉ. द. वि. चिक्करमने

जीवन शिक्षण अंक जानेवारी – १९६० मधील लेख

**क्रमश :**

**(जीवन शिक्षण डिसेंबर २०२२ मधून पुढे चालू)**

- **शालेय कामाचे नियोजन :**

आतापावेतो शाळा सुधारण्यासाठी ज्या निरनिराळ्या योजना केल्या आहेत, त्यांचा परामर्श घेतला. उदा. सक्तीचे शिक्षण, शालागृहे, अभ्यासक्रम वगैरे. शालेय कामाचे नियोजन आणि अध्यापनाच्या पद्धती यांची सुधारणा करण्याची योजना आखल्याशिवाय वर नमूद केलेल्या योजना मुळीच फलदायी होणार नाहीत. बेसिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सुधारून शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याबद्दलचा विचार दुसऱ्या प्रकरणात संक्षेपाने केला आहे; परंतु अध्यापन पद्धतीमध्ये जलद गतीने जे बदल होत चालले आहेत, त्यांचा विस्ताराने विचार करून वाचकांचे लक्ष त्यावर केंद्रीत करणे आवश्यक आहे, म्हणजे वाचकांना पद्धतीतील फरकांची माहिती समजेल आणि गोमही कळेल. आजवर शाळा या ज्ञान देणाऱ्या गिरण्या होत्या, आता त्या कृतिप्रधान शाळा झाल्या आहेत. शाळांच्या स्वरूपात हा जो मूलभूत फरक झाला, त्यामुळे आपोआपच अध्यापन पद्धतीमध्येही फरक घडून आला. मुलांना किती ज्ञान दिले, मुलांनी किती पाठांतर केले आणि परीक्षेमध्ये मुलांना जे शिकविले होते ते त्यांनी लिहिले किंवा नाही या गोष्टी पूर्वी महत्त्वाच्या समजल्या जात असत. शिक्षणाचा उपयुक्ततेच्या दृष्टीने विचार केला जात नसे; परंतु नव्या पद्धतीमध्ये शाळेत मूल कोणत्या प्रकारचे जीवन जगते, यालाच मुळी महत्त्व आहे आणि म्हणूनच कृतिप्रधान शाळांमध्ये मुलांना वेगवेगळ्या प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. एखादी गोष्ट पुरी करण्यासाठी मुले सामुदायिकरीत्या काम करतील. कामातून त्यांना ज्ञान व अनुभव मिळतील आणि मग विविध प्रकारच्या प्रवृत्तींची घडण होईल. नव्या शिक्षण पद्धतीने मुलाच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास करण्याचा विडा उचलेला आहे. शिक्षणाचे हे जे उद्दिष्ट आहे, ते धडे वाचून साध्य होणार नाही, त्यासाठी दुसरी काहीतरी उपाययोजना केली पाहिजे.

नव्या धर्तीच्या शिक्षणामध्ये शालेय कामाचा भर हा मुलांनी नमुन्याच्या वस्तूंची मालिका तयार करण्यावर आहे. या नमुन्याच्या वस्तू कोठल्या तरी आणि कोणत्यातरी करावयाच्या नसून त्या मूलोद्योग, सामुदायिक जीवनातील कार्यक्रम, (सफाई वगैरे) स्वराज्यसभा, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय उत्सव, सहली इत्यादींशी संबंधित असल्या पाहिजेत. विशिष्ट हेतूंची पूर्ती करण्यासाठी हे नमुने करावयाचे आहेत. नमुना तयार करणे, ही एक विशिष्ट हेतूच्या पूर्तीसाठी करावयाची हेतुगर्भ कृती होय. मग ही कृती शारीरिक असो वा बौद्धिक असो. १५ ऑगस्ट रोजी प्रकाशित करावयाचे हस्तलिखित नियतकालिक, १८'' × २४'' मापाचा जिमखाना किंवा छोटीशी बाग यांपैकी कोणतीही कृती नमुन्यादाखल घेता येईल. शालेय वर्ष सुरू होण्यापूर्वी शिक्षकांनी वार्षिक कामाचे नियोजन करणे अगत्याचे आहे. याचाच अर्थ असा की, प्रत्येक महिन्यात उद्योग, राष्ट्रीय दिनोत्सव, धार्मिक सण व उत्सव, जयंत्या, हस्तलिखित नियतकालिके, भेटी आणि सहली, सफाई आणि परिपाठ, स्वराज्यसभा इत्यादींशी संबंधित असलेल्या कोणत्या कृती घेऊन नमुने तयार करता येतील, याची आखणी करणे हा होय. या नमुन्याच्या पुढील सदरांतच नमुने तयार करीत असताना कोणकोणते विषय (विशेष मुद्दे)

शिकविता येतील, हेही शिक्षक नियोजन पत्रकात नमूद करील, इतिहास, भूगोल, भाषा, अंकगणित इत्यादी सर्व विषयांशी संबंधित नमुने असू शकतील. समवाय पद्धतीने कृतीतून ज्ञान मिळविल्यानंतर, ते कसे पक्के करावयाचे व प्रसंगी त्या ज्ञानाचा उपयोग कसा करावयाचा याकडे घटवून घेताना शिक्षक विशेष लक्ष देतील. अभ्यासक्रमाचे याप्रमाणे नियोजन करताना शिक्षकाला काही विषय किंवा काही मुद्दे यांची कृतीशी सांगड घालता येणार नाही, हे लक्षात येईल. अर्थातच या विषयांचा किंवा मुद्द्यांचा परामर्श कोणत्या पद्धतीने घ्यावा, याबद्दलही त्याला विचार करावा लागेल. अशा रीतीने जुन्या अध्यापन पद्धतीचा अवलंब न करता नवीन नमुना मालिकेच्या पद्धतीचा अवलंब करून शिक्षकाला संपूर्ण अभ्यासक्रमाची आखणी करता येईल. आवृत्ती, तुटकपणा भरून काढणे व एकंदर विषयामध्ये सुसंगतपणा व पद्धतशीरपणा आणणे या गोष्टी त्याला प्रसंगवशात् करता येतील. प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्यापूर्वी नवीन शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकाजवळ शाळेच्या वार्षिक कामाचे नियोजन तयार असले पाहिजे.

नमुना तयार करणे ही साधीसुधी बाब नसून कौशल्याची बाब आहे. शिक्षकांनी स्वतः अशा प्रकारे काम केले पाहिजे की, त्यामुळे मुलांच्या मनात काम करण्याविषयी जोरदार प्रेरणा निर्माण व्हावी. एक नमुना तयार करताना चार अवस्थांतून जावे लागते. पहिली अवस्था चालना देण्याची. नमुना तयार करण्यामागे कोणता हेतू आहे, हे मुलांना कळले पाहिजे. हेतू जितका जोरदार असेल तितक्या जोरदारपणे नमुना पुरा करण्यासाठी मुले काम करतील. म्हणून जोरदार चालना मिळण्याची आवश्यकता आहे. नमुन्याची दुसरी अवस्था योजना (आखणी) ही होय. नमुना कसा पुरा करता येईल, याची बारीकसारीक तपशीलासह मुले आखणी करतील. या ठिकाणी बौद्धिक किंवा शास्त्रीय ज्ञानाची मुलांना गरज भासेल. अपेक्षेप्रमाणे नमुना तयार करणे, ही तिसरी अवस्था. कामाचे मूल्यमापन करणे, अपेक्षा आणि प्रत्यक्ष हेतू कितपत साध्य झाला आहे, हे ठरविणे आणि नमुना तयार करताना झालेल्या चुकांचा परामर्श घेणे या सर्व गोष्टींचा अंतर्भाव चौथ्या अवस्थेत होतो.

वानगी दाखल कोणताही नमुना घेऊन या चारही अवस्था सप्रमाण मांडून दाखविता येतील. १८''×२४'' या मापाचे चौथीतील विद्यार्थ्यांनी आसन तयार करावयाचे आहे, नमुना करण्यामागील हेतू स्पष्ट आहे. मुले अस्वच्छ आणि खराब जमिनीवर बसू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे कपडे मलीन होतात, शिवाय असे बसणे आरोग्याला घातक आहे, म्हणून बसण्यासाठी मुलांना आसनांची आवश्यकता आहे. या ठिकाणी नमुना तयार करण्यासाठी लागणारी योग्य अशी चालना मिळाली. मग हे आसन कसे करावे, केवढे करावे याबद्दलची आखणी सुरू होते. आसनाची लांबी किती असावी, रुंदी किती असावी, एकूण सूत किती लागेल तितके सूत काढण्यासाठी किती कापूस घेतला पाहिजे, कापूस घेतल्यानंतर तो स्वच्छ करणे आलेच. पिंजणे आले, पेळू करणे आले, सूत कातणे आले आणि शेवटी विणणेही आले. अशा प्रकारे सर्व गोष्टींची तपशीलवार आखणी मुलांना करावी लागते. ही आखणी केल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरूवात होते. आखणीप्रमाणे कापूस आणला जातो, तो पिंजला जातो, त्याचे पेळू केले जातात, सूत कातले जाते आणि शेवटी विणून आसन तयार केले जाते. शेवटी आसन कोणत्या प्रतीचे झाले, त्यात कोणते दोष राहिले आणि त्यात सुधारणा कशी घडवून आणता येईल इत्यादी बाबत विचार करता येतो. आसनाचा नमुना उदाहरणादाखल घेतला. आता हस्तलिखित नियतकालिकाचा नमुना घेऊ. हस्तलिखित तयार करण्यासाठीसुद्धा प्रेरणा पाहिजे. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती साजरी करावयाची आहे. त्या वेळी इतर कार्यक्रमांबरोबरच हस्तलखित मासिकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम ठेवता येईल. गांधीजींचे जीवन आणि कर्तृत्व या विषयावरचा हा

खास अंक असेल. कार्याला अशाप्रकारे प्रेरणा मिळेल. मग आखणीला सुरुवात होईल. कोणकोणत्या गोष्टी मिळविल्या पाहिजेत? साहित्य, चित्रे आणि विविध माहिती कशी गोळा करावी? यांची मांडणी कोणत्या पद्धतीने करावी? या सर्व गोष्टी आखणी या सदरात मोडतील. लेख लिहिणे, चित्रे काढणे आणि मासिकाला बाइंडिंग करणे या गोष्टी प्रत्यक्ष कृतीमध्ये येतील. शेवटी त्याचे मूल्यमापन, दोष-दिग्दर्शन, दोष का राहिले याचे विवरण इत्यादी गोष्टी करता येतील. या पद्धतीप्रमाणे अनेक शालेय नमुने तयार करता येतील आणि मूलोद्योग व विद्यार्थ्यांचे जीवन यांतून निवडलेल्या प्रसंगांच्या नमुनामालिकेच्या द्वारे शाळेचे अध्यापन करता येईल.

उपरिनिर्दिष्ट वर्णनावरून नवीन अध्यापन पद्धतीमुळे शिक्षणात कृतीचा समावेश केला आहे, हे समजून येईल. आता शिक्षणाच्या साहित्याचा विचार करू. ज्याअर्थी नवीन पद्धतीत जीवन-प्रसंगांतून आणि उद्योगांतून शिक्षण द्यावयाचे आहे, त्याअर्थी मुबलक शैक्षणिक साहित्य मिळण्यास वाव आहे. सुरुवातीला भेटी आणि अनुभव हे शैक्षणिक साहित्याला पायाभूत ठरतील. उदाहरणादाखल अंकगाणित घेऊ. जरुरीपुरते अंकगणित मूलोद्योगाच्याद्वारे शिकविता येईल. अंकांची गरज, दशांश पद्धतीने संख्या मांडणे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, अपूर्णांक, त्रैराशिक, नफा-तोटा, शेकडेवारी, क्षेत्रफळ इत्यादी उद्योगाद्वारे शिकविता येतील, एवढेच नव्हे तर पुस्तकापेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेने आणि अधिक परिणामकारकरीत्या शिकविता येतील. केवळ अध्यापनासाठीच प्रसंग मिळतील असे नाही, तर आवृत्ती आणि घटवून घेणे यासाठीही प्रसंग मिळतील. उदाहरणादाखल इतिहास-भूगोल घेऊ. इतिहास व भूगोलातील कितीतरी मुद्दे दैनिक वृत्तवाचनाच्या वेळी घेता येतील. स्थळे दाखविण्यासाठी आराखड्यांची गरज भासेल. अशाप्रकारे जीवन प्रसंगच शिक्षकांना नैसर्गिक, शैक्षणिक साहित्य देऊ शकतील. नकाशे, मॉडेल्सचे नमुने, आकृती इत्यादी गोष्टींचे नमुने, शिक्षक आणि विद्यार्थी शैक्षणिक साहित्य म्हणून तयार करतील, छापील नकाशे व चित्रे यांवर आपण सहसा अवलंबून राहू नये. एकतर ती महाग असतात आणि म्हणूनच प्राथमिक शाळेच्या आवाक्याबाहेरची असतात. खर्चाचा मुद्दा जरी बाजूला सारला तरी, अशी चित्रे किंवा नकाशे शिक्षकाच्या स्वतंत्र कर्तृत्वाला आणि प्रेरणेला मारक ठरतात. ड्रॉईंगपेपर, रंगपेटी, ब्रश, माती, कागदाचा लगदा इत्यादी साहित्य जर शिक्षकाला दिले, तर ते अल्प खर्चात वाचनाचे तक्ते, चित्रे वगैरे शैक्षणिक साहित्य तयार करू शकतात व त्यांचा उपयोग वर्गासाठी करतात. अशाप्रकारे तयार केलेल्या वस्तूंचा संग्रह करता येईल. उपयुक्त चित्रे आणि आराखडे कोणकोणत्या सचित्र नियतकालिकांतून येतात, याकडे शिक्षक लक्ष देतील आणि भूगोल, इतिहास, शास्त्र इत्यादी विषयांच्या अध्यापनाला उपयोगी पडतील, अशा चित्रांचा व आराखड्याचा संग्रह करतील. एक साच्याचे छापील शैक्षणिक साहित्य शाळांना फारसे उपयोगी पडत नाही. जीवनक्षेत्रांतून योग्य ते साहित्य निवडून त्यांचा उपयोग शैक्षणिक साहित्य म्हणून करावयास शिक्षकाने शिकले पाहिजे आणि हीच खरी शैक्षणिक अध्यापनाची रीत होय.

आता क्रमिक पुस्तकांचा मुद्दा घेऊ. जुन्या शिक्षण पद्धतीत क्रमिक पुस्तकांवर शाळा अवलंबून असत. परीक्षेच्या दृष्टीने त्या पुस्तकांचा अभ्यास मुलांकडून करवून घेत असत. ही जुन्या शिक्षण पद्धतीची रीत होती. नवीन शिक्षण पद्धतीत या रीतीला थारा नाही. भाषेच्या सूक्ष्म अभ्यासाकरिता क्रमिक पुस्तकांची गरज भासेल; परंतु त्यातील धड्यांचा अन्योन्य संबंध विद्यार्थ्यांच्या जीवनाशी जोडलेला असेल, मुले शाळेत ज्या कृती करतात त्यावर आधारित असे ते धडे असतील. अशाप्रकारे ते धडेही कृतीला पूरक असतील. १५ ऑगस्टला शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा करतात आणि पुस्तकात मुलांना तत्संबंधी धडा वाचावयास मिळतो.

मुले गांधीजींची जयंती साजरी करतात आणि क्रमिक पुस्तकामधील गांधीजींचे जीवन आणि कार्य यावरील धडा वाचतात. मुले ज्या कृती करीत असतील त्यांना अनुसरूनच क्रमिक पुस्तकातील धडे असले पाहिजेत. इतिहास, भूगोल किंवा शास्त्र इत्यादी माहिती देणारे जे विषय आहेत, त्यांना मुळी क्रमिक पुस्तकांची गरजच नाही. उलटपक्षी मुलांचे वय आणि कुवत लक्षात घेऊन शाळेने निरनिराळ्या विषयांवरील वेगवेगळ्या पुस्तकांचा भरपूर पुरवठा केला पाहिजे. मात्र ती पुस्तके साधी, सोपी आणि मुलांच्या सहज पचनी पडणारी पाहिजेत. अशा पुस्तकांतून मुले हवी ती व आवश्यक ती माहिती जमा करू शकतील. उदाहरणार्थ, बागकामाच्यावेळी खताचा प्रश्न निर्माण होईल. अशा वेळी खतावरील जी पुस्तके असतील ती पुस्तके मुले वाचतील आणि निरनिराळ्या प्रकारच्या खतांची माहिती मिळवतील. शिवजयंती साजरी करावयाची आहे. मुले ताबडतोब ग्रंथालयांत जातील, योग्य ती पुस्तके निवडतील व त्यातून छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन आणि कार्य यासंबंधी पुरेशी माहिती मिळवतील. हा सुद्धा एक कृतीचा नमुनाच आहे. यामुळे कष्ट करण्याची आणि ग्रंथांतील दाखले शोधण्याची सवय जडते, शिवाय स्वयंप्रेरणा निर्माण होते ती वेगळीच. शाळेत अशा सवयींना उत्तेजन दिले पाहिजे. शिकलेली तत्त्वे किंवा नियम पक्के होण्यासाठी गणिताच्या बाबतीत जर कशाची गरज असेल, तर आवृत्तीच्या उदाहरणमालिकांची; ही उदाहरणमालिका विद्यार्थी जीवनातून निवडली पाहिजे. हे कार्य शिक्षकांचे आहे. निवडून काढलेल्या उदाहरणांचे संग्रह शिक्षकांनी करून ठेवले पाहिजेत व त्याचा योग्य वेळी उपयोग केला पाहिजे. बेरीज किंवा अपूर्णांक किंवा त्रैराशिक किंवा क्षेत्रफळ इत्यादींचे नियम पक्के करण्यासाठी काही निवडक उदाहरणे लागतील. ही सर्व उदाहरणे मूलोद्योगांतून किंवा जीवनप्रसंगातून निवडली पाहिजेत.

नवीन शिक्षण पद्धतीत त्रिविध तऱ्हेने क्रमिक पुस्तकांचा संबंध येतो. भाषेच्या सूक्ष्म अभ्यासासाठी कुठले तरी ठरावीक पुस्तक नियुक्त केले पाहिजे; परंतु या पुस्तकांतील धडे मुलांच्या कृतींशी सुसंबंधित आणि पूरक असले पाहिजेत. इतिहास, भूगोल, शास्त्र इत्यादी माहिती देणाऱ्या विषयांसाठी योग्य आणि समृद्ध ग्रंथालय असले पाहिजे. माहिती मिळविण्यासाठी मुले या ग्रंथालयाचा वारंवार उपयोग करतील. गणित विषयाचा विचार करताना तत्त्वे व नियम बिंबविण्यासाठी शिक्षकांनी योग्य उदाहरणांचा संग्रह करून ठेवला पाहिजे. सांप्रत इतिहास, भूगोल, गणित, शास्त्र इत्यादी विषयांसाठी, प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र क्रमिक पुस्तके तयार करण्याची जी पद्धती आहे, ती कृती–शाळेला बिलकूल मानवणारी नाही. मुलांची प्रेरणा आणि काम करण्याची प्रवृत्ती या गोष्टी यामुळे मारल्या जातात आणि मुलांमध्ये समजल्याशिवाय पाठांतर करण्याची पोपट प्रवृत्ती वाढीस लागते. पालकांना भारी आर्थिक भुर्दंड बसतो, ही एक महत्त्वाचीच गोष्ट आहे आणि जेव्हा अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तके वारंवार बदलतात, तेव्हा तर पालक हैराण होऊन जातात.

जुन्या शिक्षणपद्धतीत सर्व तऱ्हेने सुधारणा घडवून आणण्याचा चंग नवीन शिक्षणपद्धतीने बांधला आहे. मुलांचा सर्वांगीण विकास करणे, हे नवीन पद्धतीचे ध्येय आहे. ज्या नवीन नवीन गोष्टींची सुरुवात शाळांतून झाली आहे, त्यामुळे मुलांच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास कसा घडून येईल, याची स्पष्ट कल्पना शिक्षक व पालक यांनी करून घेतली पाहिजे.

- **शालेय कामांतील काही कृती नमुने :**

मागील प्रकरणात हेतुगर्भ कृतीतून शिकविण्याच्या पद्धतीची माहिती दिलेली आहे. या खेडेगावातील रस्ते दाखवतील आणि रस्त्यांच्या बाजूला हेतुगर्भ कृतींचा शेवट, नमुना तयार होण्यात होतो. म्हणून या पद्धतीला नमुनापद्धती असे म्हणतात. या पद्धतीमुळे अध्यापन अधिक प्रभावी होते, विद्यार्थ्यांच्या आंतरिक प्रेरणांना व कर्तृत्वाला वाव मिळतो. ही पद्धती आजकाल शाळांतून

वाढत्या प्रमाणावर अवलंबिली जात आहे. अतएव, येथे वर्गात केलेल्या कृती नमुन्यांपैकी काही नमुने देत आहोत. हेतू हा की, तसल्याच प्रकारचे नमुने आपल्या शाळांतून करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा. अशा कृती नमुन्यांची आखणी शिक्षक सहजासहजी करू शकतील आणि तितक्याच सहजतेने ती कार्यवाहीत आणतील, येथे जे काही नमुने देत आहोत, ते वानगी दाखल.

पहिल्या इयत्तेत जेव्हा मुले पहिल्यांदाच एकत्र जमतात, तेव्हा 'ओळख करून घेऊ' हा कृती नमुना करता येईल. एकमेकांची नावे आणि पत्ते मुलांना माहिती असणे किंवा त्यांनी जाणून घेणे हे केवळ नैसर्गिक आहे. म्हणूनच मुले नाव सांगून स्वतःची ओळख करून देतात. शिक्षक एका जाड कागदावर सर्व मुलांची नावे मोठ्या अक्षरात लिहितात आणि ते कागद मुलांना देतात. फळ्यावर देखील शिक्षक मुलांची नावे लिहितात. मुलांना एकमेकांची नावे कळतात आणि मुले ती नावे वाचू शकतात. मुले आपल्या पालकांची नावे व आडनावे वाचू शकतात. मग मुलांच्या मनात नावे वाचण्याची आणि लिहिण्याची तीव्र प्रेरणा निर्माण होते. यावेळी वाचन आणि लेखन यासाठी व्यक्तिगत अध्यापनाची गरज निर्माण होते. या पद्धतीमुळे मुळाक्षरे आणि बाराखड्या शिकवून मग वाचन आणि लेखन करण्याला जितका वेळ लागतो, त्यापेक्षा कितीतरी कमी वेळात मुले लेखन–वाचन शिकतात. 'एकमेकांची ओळख करून घेऊ या' या कृतिनमुन्याचा विस्तार 'एकमेकांचे पत्ते जाणून घेऊ या' इथवर करता येईल. आपले घर कोणत्या विभागात आहे, कोणत्या गल्लीत आहे, कोणत्या रस्त्याजवळ आहे, इत्यादी माहिती प्रत्येक मूल सांगेल. शिक्षक खेड्यांचा नकाशा काढतील, यामध्ये खेडेगावातील रस्ते दाखवतील आणि रस्त्यांच्या बाजूला विद्यार्थ्यांची घरे दाखवतील. गावातून फिरता फिरता आपापल्या मित्रांची घरे शोधून काढतील. या रीतीने मुलांना खेडेगावात किंवा शहरात आपली घरे निश्चित कोणत्या ठिकाणी आहेत, हे जाणता येईल. या नमुनाकृतीवरून 'आमच्या पालकांचे उद्योगधंदे' या नमुनाकृतीकडे वळता येईल. काही पालक शेतकरी, काही कामगार, काही सुतार, काही दुकानदार, काही सरकारी नोकर तर काही मजूर असू शकतील. पालकांच्या या वर्गवारीवरून खेड्यांमध्ये चालणारा सर्वसाधारण व्यवसाय आणि उद्योगधंदा कोणता, हे मुलांना कळून चुकेल आणि या असल्या नमुना–कृतीद्वारा पुष्कळसा भूगोल व राज्यव्यवस्था यांचा अभ्यास करता येईल.

**क्रमशः**

'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director

# इतिहासाच्या पानांवरून

श्रीकांत चौगुले
भ्रमणध्वनी : ७५०७७७९३९३


## धुळाक्षरे ते धातूची अक्षरे

पूर्वी पंतोजींच्या शाळा होत्या. शैक्षणिक साधनेही फारशी उपलब्ध नव्हती. मुळाक्षरे गिरविण्याचा सराव मातीवर केला जायचा. लाकडी फळी किंवा चौकट असायची. त्यावर बारीक माती किंवा समुद्राची वाळू पसरविली जायची. त्यामध्ये बोटाने अक्षरे काढायची व तळहाताने माती सपाट करून ती बुजवायची. पुन्हा अक्षरे काढायची. असा तो सराव केला जायचा. याला धूळपाटी म्हणत.

नंतरच्या काळात दगडी पाटी, पत्र्याची पाटी, संख्याज्ञानासाठी मण्यांची चौकट सोबत असणारी पाटी. असे पाटीचे अनेक प्रकार आले. दोन–तीन दशकांपूर्वी मुलांच्या खेळण्याच्या दुकानात बिजडम बॉक्स मिळायचे. त्यामध्ये प्लॅस्टिक ठोकळ्यांवर अक्षरे छापलेली असायची. ती जुळवून वाचन करणे रंजक ठरत असे. आता ते प्रमाण कमी झाले आहे, पण एक गमतीचा भाग म्हणजे शंभर–सव्वाशे वर्षांपूर्वी अशीच धातूच्या अक्षरांची पेटी उपलब्ध होती. त्यामध्ये ॲल्युमिनियम धातूची अक्षरे व अक्षरांचे अवयव होते. ते जुळवून वाचन करायचे. ती अक्षरांची पेटी दोन रुपयाला मिळत असे. त्याला शाळाखात्याची मान्यता होती. त्याविषयीची जाहिरात 'मराठी शिक्षक'च्या १९१३ मधील मे महिन्याच्या अंकात छापली आहे. त्यामध्ये गंगाधर हरी गोगटे यांच्याकडे ती पेटी विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे म्हटले आहे.

याच काळात मुळाक्षरांची रंगीत कार्डे उपलब्ध होती. त्याला चित्रमय रंगीबेरंगी 'गंजीफा' असे म्हटले आहे. त्याची किंमत पाच आणे इतकी होती.

आता तर वेगवेगळ्या साधनांमुळे मुळाक्षरांसंबंधी चित्रमय चलचित्रे मुलांना पाहता येतात. बऱ्याच शाळांमध्ये आता स्मार्ट टीव्हीसुद्धा आले आहेत, पण शंभर वर्षांपूर्वी मुळाक्षरे शिकविण्यासाठी केलेले हे विविध प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद वाटतात.



नवनियुक्त संचालक मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील पदभार स्वीकारला. याप्रसंगी परिषदेचे सहसंचालक, सर्व उपसंचालक, सर्व उपविभाग प्रमुख, अन्य अधिकारी, विषय सहायक आणि कर्मचारी उपस्थित होते.




दि. २० जानेवारी २०२३ रोजी **SCERT,** महाराष्ट्र, पुणे, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर आणि दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय इंग्रजी भाषा चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मा. श्री. सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण) तसेच मा. श्री. दिलीप स्वामी, मु. का. अ., जि. प. सोलापूर, मा. डॉ. कलीमोद्दीन शेख, संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद, मा. श्री. अरुण सांगोलकर, इंग्रजी विभाग प्रमुख, **SCERT,** महाराष्ट्र, पुणे, आयोजक संस्थेचे संस्थापक मंडळ, सर्व **DIET** चे इंग्रजी विभाग प्रमुख, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक विभागातील इंग्रजीचे शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी मा. आयुक्त यांनी इंग्रजी भाषा शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मार्गदर्शन केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे **SCF, NEP-2020** टास्क तसेच **ASER** अहवाल या अनुषंगाने दि. २३ जानेवारी २०२३ रोजी आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मा. श्री. सूरज मांढरे, आयुक्त (शिक्षण), मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर, संचालक, **SCERT,** महाराष्ट्र, पुणे तसेच शिक्षण विभागातील मान्यवर अधिकारी उपस्थित होते.



Date of Publication 3 January 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th January 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**



पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________________
______________________
______________________
______________________